# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२१

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०९ मार्च, २०२१ / फाल्गुन १८, १९४२ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **गृह मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **महसूल मंत्री** | |
| **(३)** | **पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, क्रीडा व युवक कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **कृषी, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **रोजगार हमी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(६)** | **वस्त्रोद्योग, मत्स्यव्यवसाय, बंदरे मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५४**

---

## वसई (जि.पालघर) तालुक्यात गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाल्याबाबत

**(१) * ६८२३ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) तालुक्यात गुंतवणूकदारांची आर्थिक फसवणूक झाल्याप्रकरणी शुभांगी पंढरीनाथ बोडखे व इतर यांनी पोलीस निरीक्षक अर्नाळा सागरी पोलीस ठाणे (ता.वसई, जि.पालघर) यांचेकडे दिनांक १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी तक्रार दाखल करुनही संबंधितांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एक वर्षाचा कालावधी झाल्यानंतर पोलीस निरीक्षक, अर्नाळा सागरी पोलीस ठाणे यांनी सदर प्रकरण माणिकपूर पोलीस स्टेशन यांचेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहे, सदरहू प्रकरण एक वर्षानंतर हस्तांतरीत करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, संबंधित महिला व इतर यांनी मागील एक वर्षापासून न्याय मिळण्यासाठी पोलीस ठाण्यामध्ये वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा न्याय मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आर्थिक फसवणूक करणाऱ्या दोषींवर तसेच या प्रकरणावर कारवाई करण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या पोलीस प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) अर्जदार शुभांगी पंढरीनाथ बोडके, रा. विरार व इतर ७ यांनी यातील गैरअर्जदार श्री.रंजित रमेश खाडे व सौ.दिप्ती रामेश्वर पांडे यांनी आर्थिक फसवणूक केल्याबाबतची तक्रार दिनांक १६/११/२०१९ रोजी अर्नाळा पोलीस ठाणे येथे देण्यात आली होती. परंतु अर्जदार यांचे इतर ०७ साथीदारांपैकी अर्जदार श्री.कुणाल कपाटे यांनी सम मजकुराच्या अर्जातील प्रकरणाबाबत माणिकपूर पोलीस ठाण्यात गु.र.क्र. २२८/२०२० प्रमाणे दिनांक १६/०६/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अर्जदार या सदर गुन्हयातील साक्षीदार असल्याने त्यांचा अर्ज गुन्हयाचे तपास कामी माणिकपूर पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने यातील गैरअर्जदार रंजित रमेश खाडे व दिप्ती पांडे (खाडे) यांच्या राहत्या ठिकाणी वेळोवेळी जावून शोध घेतला असता गैरअर्जदार हे त्यांच्या ठिकाणी मिळून आले नाहीत. म्हणून गैरअर्जदार यांचे नातेवाईक यांना समज देऊन गैरअर्जदार यांना चौकशीकामी हजर करणेबाबत कळविले होते. परंतु गैरअर्जदार हे चौकशीकामी पोलीस ठाण्यास हजर झालेले नाहीत. तसेच मार्च, २०२० पासून कोविड-१९ च्या महामारीचा मोठ्या प्रमाणात उद्रेक झाल्याने व पोलिसांवर कोविडची

जबाबदारी वाढल्याने सदरचा तक्रार अर्ज प्रलंबित राहिला. त्याबाबत अर्जदार यांना वेळोवेळी मोबाईल फोनव्दारे तसेच समक्ष अर्ज चौकशी चालू असल्याबाबत कळविले होते. दरम्यानच्या काळात सहअर्जदार श्री.कुणाल कपाटे यांच्या तक्रारीवरुन माणिकपूर पोलीस ठाणे गुन्हा क्र.२२८/२०२० नुसार दाखल करण्यात आला असल्याने व अर्जदार यांचीही त्यामुळे फसवणूक झाली असल्याने त्यांचा दिनांक १६/११/२०१९ रोजीचा अर्ज दिनांक ०६/११/२०२० रोजी माणिकपूर पोलीस ठाणे येथे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

(४) व (५) यातील अर्जदार यांचा तक्रारी अर्ज दिनांक २६/११/२०१९ रोजी अर्नाळा पोलीस ठाणे स्थानिक अर्ज क्र.२४५/२०१९ अन्वये प्राप्त आहे. तसेच सदर प्रकरणी फसवणूक करणाऱ्या दोषींवर दिनांक १६/०६/२०२० रोजी गुन्हा क्र. २२८/२०२० दाखल करण्यात आला आहे. तसेच अर्जदार यांचा अर्ज दिनांक ०६/११/२०२० रोजी विलंबाने माणिकपूर पोलीस ठाण्यात वर्ग केला आहे. याबाबत चौकशी अधिकारी यांनी अर्ज चौकशीसाठी विलंब लावल्याबाबत त्यांचा कसुरी अहवाल प्राप्त झाला असून त्याबाबत त्यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.

-----------------

## पेठ (ता.वाळवा, जि.सांगली) येथे कृषी अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय सुरु करण्याबाबत

**(२) * ६५७२ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत पेठ (ता.वाळवा, जि.सांगली) येथे कृषी अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय मंजूर केलेले असून परभणी येथे एकच अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय आहे व दुसरे पेठ येथे अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय क्रांतीसिंह नाना पाटलांच्या नावाने मंजूर करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महाविद्यालयाच्या पद निर्मितीला दिनांक २० सप्टेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास मान्यता देण्यात आली असून रुपये ६१ कोटी ५७ लाख इतक्या निधीच्या प्रस्तावास दिनांक २१ जून, २०१९ रोजी मान्यता

देण्यात आली आहे, तसेच १०% काम देखील पूर्ण झालेले आहे, असे असताना पेठच्या कृषी तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या बांधकामाला दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कृषी अन्नतंत्रज्ञान महाविद्यालयाला शासनाने स्थगिती दिल्यामुळे विधानपरिषद सदस्यांनी हिवाळी अधिवेशन, २०१९ मध्ये महाविद्यालयाची स्थगिती उठविणेबाबत औचित्याचे मुद्दयाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर महाविद्यालयाचे काम पूर्ण करुन सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, शासन निर्णय क्र.मफुकृवि-१४१९/प्र.क्र.२२/७-अे, दिनांक २० सप्टेंबर, २०१९ अन्वये सदर महाविद्यालयाच्या पदनिर्मितीला मान्यता देण्यात आलेली आहे. तसेच शासन निर्णय क्र. मफुवि-१४१९/प्र.क्र.०२/७-अे, दिनांक २१ जून, २०१९ अन्वये महाविद्यालयाच्या बांधकामासाठी रुपये ६१,५७,१३,८५१/-इतक्या रकमेस शासनाने प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. विद्यापीठाने जा.क्र.बांध/४४३२/निविदा/२०१९, दिनांक २०/१२/२०१९ अन्वये सदर कामास स्थगिती दिलेली आहे, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) विद्यापीठाकडे उपलब्ध असलेल्या रुपये १२.४२ कोटी इतक्या निधीपैकी कृषी महाविद्यालय, मुक्ताईनगर व अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, पेठ या महाविद्यालयाच्या कामांसाठी रुपये ७.५६ कोटी रक्कम वापरण्यास विद्यापीठ सक्षम असल्याने पेठ महाविद्यालयाच्या कामांसाठी एकूण रुपये ४.१४ कोटी रक्कम विद्यापीठाने उपलब्ध करुन दिली असून त्यातून १०% plinth लेव्हलपर्यंत काम पूर्ण झाल्याचे तसेच प्रशासकीय इमारत, विद्यार्थी व विद्यार्थीनी वसतिगृहे इ. बांधकामाचे प्रथम धावते बिल व वास्तुविशारद यांचे सल्लामसलत शुल्क अदा करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त सन २०२०-

२०२१ या वित्तीय वर्षामध्ये, सदर महाविद्यालयाच्या बांधकामासाठी रुपये ५.०० कोटी एवढी तरतूद अर्थसंकल्पीत करण्यात आली आहे. तथापि, वित्त विभागाच्या दिनांक ०४/०५/२०२० चे शासन निर्णयातील मुद्दा क्र. २ अन्वये, कोरोनाच्या पार्श्वभुमीवर कार्यक्रमांतर्गत खर्चावरील निधी वितरणास निर्बंध लादले आहेत. यास्तव अर्थसंकल्पीत निधीतुन अद्याप बांधकामांना निधी वितरित करण्यात आलेला नाही. तथापि, विद्यापीठांकडील अपूर्ण कामांसाठी निधी वितरित करण्यात यावा, याकरीता प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे. तसेच सन २०२०-२०२१ चे सुधारित अंदाजामध्येही अर्थसंकल्पीय तरतूद कायम ठेवण्यात आलेली आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## तत्कालीन तहसिलदार, औरंगाबाद यांनी शासनाचा महसूल बुडविल्याबाबत

**(३) * ६६३४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद ग्रामीणचे तत्कालीन तहसिलदार यांनी कुळ जमीन विक्री व्यवहारास परवानगी देतांना नियमांचे उल्लंघन करुन खरेदीदारांकडून जमिनीच्या रेडीरेकनर दरानुसार निम्मी रक्कम वसुल केली नसल्यामुळे शासनाचा रुपये तीन कोटींचा महसूल बुडाला असल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन तहसिलदार यांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश शासनाने दिले आहेत काय, खातेनिहाय चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी तत्कालीन तहसिलदार यांना दिनांक ०९/१०/२०१९ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावलेली आहे. परंतु, त्यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्यामुळे त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील नियम ८ नुसार विभागीय चौकशी सुरु करण्यासाठी जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दोषारोप जोडपत्र क्र.०१ ते ०४ पुरावे कागदपत्रांसह विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केलेले आहेत. त्यानुषंगाने, प्रस्तुत प्रकरणी कारवाई चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सूर्या नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उत्खनन सुरु असल्याबाबत

**(४) * ६९११ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सूर्या नदीपात्रातून शासनाच्या नियमाचे उल्लघंन करुन अवैधरित्या वाळूचे उत्खनन सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सूर्या नदीपात्रात डहाणू तालुक्यातील उर्से, साये-आंबिस्ते व पालघर तालुक्यातील नानिवली आकेगव्हान गावांमध्ये मोठे धोकादायक खड्डे निर्माण होऊन नदीचा प्रवाह बदल होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैधरित्या वाळू उत्खनन करणाऱ्या वाळूमाफियावर तसेच वाळू उत्खननाकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) मौजे उर्से, ता.डहाणू, जि.पालघर येथील सूर्या नदी किनाऱ्यालगतच्या खाजगी सामायिक जमिनीमध्ये विटभट्टीकरीता लागणाऱ्या मातीचे तसेच त्याखाली असलेल्या रेतीचे अवैध उत्खनन केल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ मध्ये आढळून आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) माती व वाळूच्या अवैध उत्खनन प्रकरणी संबंधितांना रुपये ३५,९३,७००/- इतक्या रकमेचे दंडात्मक आदेश दिनांक ९/२/२०२१ रोजी तहसिलदार, डहाणू यांनी बजावले असून संबंधितांकडून दंडात्मक रकमेची वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात मासेमारी बंदी कालावधीत कोळी बांधवांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(५) * ७०६४ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या नियमानुसार माहे जून-जुलै या कालावधीमध्ये मासेमारी करण्यास बंदी असल्याने उक्त दोन महिन्यासाठी मासेमारी न करणाऱ्या कोळी बांधवांच्या उदरनिर्वाहकरीता तामिळनाडू राज्यात दोन महिन्याकरीता रुपये दहा हजार नुकसान भरपाई दिली जात असल्याने त्याच धर्तीवर राज्यातील मच्छीमार कोळी बांधवांना मदत देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी व मच्छीमार कोळी बांधवांनी शासनाकडे केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०२० च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील मच्छीमारांना माहे जून-जुलै या मासेमारी बंदी कालावधीमध्ये रुपये दहा हजार नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) व (२) मासेमारी करण्यास बंदी असलेल्या कालावधीत तामिळनाडू राज्याच्या धर्तीवर नुकसान भरपाई देण्याची मागणी मच्छीमार कोळी बांधवानी केली आहे.

मासेमारी करण्यास बंदी असलेल्या कालावधीत तामिळनाडू राज्यात सन २०१७ पासून रुपये ५००० नुकसान भरपाई देण्यात येत असल्याचे आढळून आले आहे.

तथापि, राज्यात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार मच्छीमारांसाठी राष्ट्रीय कल्याणकारी बचतीसह मदतीची योजना या योजनेमध्ये दारिद्र्य रेषेखालील मच्छीमार कोळी बांधवांना सन २०१७-२०१८ मध्ये रुपये ५३.०७ व सन २०१८-२०१९ मध्ये ४०.२० लक्ष एवढा निधी वाटप करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील शासकीय जमिनींचे भाडे संस्थांनी थकविल्याबाबत

**(६) * ७५०२ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरात एक रुपया लीजवर शासनाकडून सामाजिक कामांसाठी जागा घेऊन बारा संस्थांनी पाच वर्षांच्या काळात रुपये १९८ कोटी नफा कमावल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या गैरकारभाराचा फायदा घेऊन या संस्थांनी आर्थिक लाभ करुन घेतला परंतु शासनाने या संस्थांकडून भाडे वसूल केले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामाजिक बांधिलकीतून जागा मिळवून त्या जमिनींचा वापर नफेखोरीसाठी करणाऱ्या संस्थांची शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

तथापि, १९८ कोटी रुपये रक्कम ही नफ्याची नसून मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांनी जनहित याचिका क्र.४५/२०१७ मध्ये नियुक्त केलेले Amicus Curiae यांनी दिलेले अहवालातील संस्था/क्लब उत्पन्नाच्या रक्कमा आहे.

(२), (३) व (४) शासनाने अनुदानित करण्यात आलेल्या जमिनीचे करारनामा/ भाडेपट्टा/सनदेतील नमुद भुईभाड्याची आकारणी नियमानुसार करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्रमांक ४५/२०१७ मधील मा.न्यायालयाकडून गठीत करण्यात आलेल्या समितीच्या अहवालानुसार समितीने तपासणी केलेल्या बारा संस्था/क्लब यांची माहिती दिनांक २६ ऑक्टोबर, २०२० रोजी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाली असून मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार सदर प्रकरणात चौकशी व कार्यवाही करून याबाबतचा अहवाल न्यायालयास जमिनीचे वापराचे अनुषंगाने सादर करावयाचा असून, त्यानुसार तपासणी करून प्राप्त झालेले बारा संस्थाना जिल्हाधिकारी, नागपूर कार्यालयाकडून चौकशीकरीता दिनांक १९/११/२०२० व दिनांक १७/१२/२०२० अन्वये नोटीस देवून माहिती मागविण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित संस्थाबाबत भाडेपट्टयातील अटी व शर्तीनुसार जमीन वापराबाबत तपासणी करून नियमानुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचन विहिर योजनेचे अनुदान देण्याबाबत

**(७) * ६९२४ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) आर्वी (जि.वर्धा) तालुक्यातील ७०० शेतकऱ्यांना सन २०१९-२०२० या वर्षात सिंचन विहिर योजनेंतर्गत ३५० विहिरींचे काम पूर्ण होवूनही अनुदान मिळाले नसल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या सिंचन विहिर योजनेचे अनुदान देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांनी शासनाकडे लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शेतकऱ्यांच्या पूर्ण झालेल्या विहिरींच्या बांधकामाचे अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

(३) अनुदान देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बंजारा समाजाच्या तांड्यांना (बंजारा वस्ती) महसूली दर्जा देण्याबाबत

**(८) * ७४२७ श्री.राजेश राठोड, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५७७७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद विभागात परभणी जिल्ह्यातील जिंतूर, सेलू व पात्री येथील ९ तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याबाबत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, नागपूर व वर्धा जिल्ह्यातील तांड्यांना महसूल दर्जा देण्याबाबत करण्यात येणाऱ्या तपासण्या पूर्ण झाल्या आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त तांड्यांना महसूली दर्जा देण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय, सदर गावांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज इत्यादी मूलभूत सुविधा पुरविण्याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंजारा समाजाच्या तांड्यांना (बंजारा वस्ती) महसूली दर्जा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) औरंगाबाद विभागात परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यातील ५ वाडी/तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याचे प्रस्ताव परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाले असून सदर प्रस्तावाची तपासणी करुन आक्षेप मागविण्याची कार्यवाही सुरू आहे. तसेच सेलू व जिंतूर तालुक्यातील प्रत्येकी १ व पाथरी तालुक्यातील २ वाडी/तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे दाखल करण्याची कार्यवाही संबंधित तहसिल कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील आगरगांव व येरणगांव या महसूली गावांच्या बाहेर असलेल्या तांड्यांना तसेच वर्धा जिल्ह्यातील आर्वी तालुक्यातील बेल्हारा व दहेगांव या ३०० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या बंजारा समाजाच्या तांड्यांना महसूली गावांचा दर्जा देण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

प्राप्त माहितीनुसार सदर तांड्यांना रस्ते, पाणीपुरवठा, वीज इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पलूस (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे अनुदान प्रलंबित असल्याबाबत

**(९) * ७४३६ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पलूस (जि.सांगली) तालुक्यातील शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाचे सन २०१९-२०२० या वर्षात अनुदान मिळणेबाबत शासनाकडे मागणी करुनही शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ५ लाख १० हजार शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनासाठी अर्ज केले असून यापैकी २ लाख ४३ हजार शेतकऱ्यांना पूर्वसंमती मिळूनही अनुदान वितरित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर १५ दिवसांत मोका तपासणी करुन जिओ टॅगिंग करणे बंधनकारक असून त्यांनतर पुढील १५ दिवसांत आरटीजीएसव्दारे संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदानाची रक्कम जमा करणे अपेक्षित असतानाही अनुदान वितरित करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पलूस तालुक्यातील शेतकऱ्यांचे ठिबक सिंचनाचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) नाही.

(२) व (३) सन २०१९-२०२० या वर्षात पुर्वसंमती प्राप्त सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या राज्यातील २००८६५ शेतकऱ्यांपैकी १७१०६३ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर रुपये ४३०.३५ कोटी अनुदानाची रक्कम जमा करण्यात आली आहे. उर्वरित २९८०२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(४) पलूस तालुक्यातील पुर्वसंमती प्राप्त सुक्ष्म सिंचनाची उभारणी करुन अनुदानासाठी प्रस्ताव सादर केलेल्या २२२ शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर अनुदानाची रक्कम रुपये ४६.२२ लाख जमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रिलायन्स जियो कंपनीकडून दंडात्मक रकमेची वसूली करण्याबाबत

**(१०) * ६८५४ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : दिनांक ८ सप्टेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ३००० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथे रिलायन्स जिओ कंपनीने अवैध उत्खनन केल्याप्रकरणी त्यांच्याकडून रुपये २६ कोटींचा दंड वसूल करण्याबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांनी जिल्हाधिकारी, मुंबई यांचेकडे सन २०१९-२०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी सूचना केली होती, त्यानुसार जिल्हाधिकारी, मुंबई यांनी मुंबई परिसरातील रिलायन्स जिओ कंपनीची मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करण्याबाबतची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण न करता दोषींना पाठीशी घालत असल्याची तक्रार परभणी येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मुख्य सचिव यांच्याकडे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील कलम २६७ नुसार रुपये २५,९५,६३,७५०/- इतक्या रकमेची मागणीची नोटीस दिनांक ६/२/२०२० रोजी जिओ कंपनीच्या मुंबई येथील कार्यालयास बजाविण्यात आली होती, सदर नोटीसीच्या अनुषंगाने थकबाकीदार कंपनीने अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे अर्ज सादर केला असून अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक ३०/६/२०२० पर्यंत उक्त रकमेच्या वसूलीस स्थगिती दिली होती, सदर प्रकरणी अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या आदेशानुसार रिलायन्स जिओ कंपनीकडून दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, याबाबत थोडक्यात सविस्तर माहिती काय आहे,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई व रिलायन्स जिओ यांच्याबाबत कोणती अंतिम कार्यवाही करण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रिलायन्स जियो कंपनीवर कारवाई करुन दंडाची रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) याबाबत परभणी येथील सामाजिक कार्यकर्ते यांचे दिनांक ०१/०२/२०२१ रोजीचे निवेदन मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयात दिनांक १०/०२/२०२१ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) प्रस्तुत प्रकरणी अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक ०७/०८/२०२० रोजी अंतिम आदेश पारीत केले आहेत. सदर आदेशाव्दारे जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिनांक ०७/०८/२०१८ रोजी पारीत केलेले दंडात्मक रकमेचे आदेश रद्द केले आहेत.
(३) व (४) अपर विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दंडात्मक आदेश रद्द केल्याने वसुलीची कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती व नागपूर कृषी विभागातील आदिवासी उमेदवारांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(११) * ७४३९ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १० मधील प्रश्न क्रमांक ६२९६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या एकूण ६ कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले असल्याने सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ मधील सूचनानुसार उक्त ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाने २ कृषी पर्यवेक्षक, १ कृषी सहाय्यक, १ अनुरेखक, १ कनिष्ठ लिपिक व १ वीजतंत्री अशा एकूण ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आल्यामुळे गैरआदिवासींची पदे रिक्त करुन खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या नियुक्तीने पदे भरण्याबाबत शासनाकडे निवेदने देण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावतीच्या कृषी सहसंचालकांनी आदिवासी असणारी पदे गेल्या वर्षभरापासून अडवून ठेवल्याचे माहिती अधिकारातून निदर्शनास आले आहे, तसेच अमरावती व नागपूरच्या व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालयांनी आदिवासी उमेदवारांचे नियुक्तीपत्र अडवून ठेवल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गैरआदिवासींची पदे रिक्त करुन खऱ्या आदिवासी उमेदवारांच्या नियुक्तीने सदर पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) होय, हे खरे आहे.

विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाच्या अधिनस्त कार्यरत असणाऱ्या अनुसूचित जमातीच्या एकूण ६ कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेले आहे. त्यामुळे सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, दिनांक २१/१२/२०१९ मधील सूचनांनुसार उक्त ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदांवर वर्ग करण्यात आलेल्या आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अमरावतीच्या कृषी सहसंचालकांनी आदिवासी असणारी पदे गेल्या वर्षभरापासून अडवून ठेवल्याची बाब खरी नाही. तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, अमरावती व नागपूर हे कृषी विभागाच्या अधिनस्त नाही. त्यामुळे तेथील आदिवासी उमेदवारांचे नियुक्तीपत्र वर्षभरापासून अडवून ठेवल्याची बाब विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाशी संबंधित नाही.

(४) विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती कार्यालयाने २ कृषी पर्यवेक्षक, १ कृषी सहाय्यक, १ अनुरेखक, १ कनिष्ठ लिपिक व १ वीजतंत्री अशा एकूण ६ कर्मचाऱ्यांच्या सेवा अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या आहेत. अधिसंख्य करण्यात आलेल्या पदांमधील अनुरेखक संवर्गाची पदे पुढील आदेशापर्यंत न भरण्याच्या सूचना दिनांक ०५ जून, २००९ रोजीच्या पत्रान्वये दिलेल्या आहेत. तेव्हापासून अनुरेखक संवर्गातील पदे भरण्यात आलेली नाहीत. सन २००९ च्या सुधारित आकृतिबंधानुसार वीजतंत्री हे पद अतिरिक्त ठरविण्यात आल्यामुळे सदर पद भरता येणार नाही. कनिष्ठ लिपिक पदावरील कर्मचारी पदोन्नतीने शिपाई संवर्गातून पदोन्नत झालेला असल्याने शिपाई हे मूळ पद प्रचलित नियमानुसार भरण्यात येणार आहे. कृषी सहाय्यकांची अनुसूचित जमातीसाठी मंजूर असलेली सर्व पदे भरलेली आहेत. कृषी पर्यवेक्षकांची सरळसेवा कोट्यातील पदे सुधारित आकृतिबंधानुसार मर्यादित विभागीय परीक्षेव्दारे भरावयाची आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथे जेट्टीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१२) * ६४३१ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे : तारांकित प्रश्न क्रमांक ४७८०९ ला दिनांक २ जुलै, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हर्णे (ता.दापोली, जि.रत्नागिरी) बंदर हे मच्छिमार व्यवसायासाठी जिल्हयातील क्रमांक २ चे बंदर म्हणून ओळखले जात असून सदर बंदरात लागलेल्या मच्छीमार बोटीतून आणलेली मासळी किनाऱ्यावर आणतांना जेट्टीची सुविधा नसल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंदराच्या ठिकाणी जेट्टीची सुविधा व्हावी याकरीता लोकप्रतिनिधींनी व मच्छीमार बांधव सातत्याने शासनाकडे मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बंदराच्या ठिकाणी जेट्टीची सुविधा देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय, उक्त प्रस्तावावर कधीपर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन हर्णे येथे जेट्टीची सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) हर्णे येथे जेट्टीची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे काम प्रधानमंत्री मत्स्यसंपदा योजनेंतर्गत प्रस्तावित करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घोटगे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावात अवैधरित्या वाळू उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत

**(१३) * ६४३६ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटगे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावात तिलारी नदी पात्रातील अनेक ठिकाणाहून वाळू उपसा करण्याबाबत महसूल विभागाची रितसर परवानगी न घेता तसेच लिलाव प्रक्रिया झालेली नसताना राजरोसपणे अवैधरित्या दिवसरात्र वाळू उपसा करुन येथील वाळूचे डंपर व इतर वाहनातून वाहतूक केली जात असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध व चोरटी वाळू उत्खनन व वाहतुकीमुळे शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैधरित्या वाळू वाहतूक करणारी वाहने सुसाट वेगाने जात असल्याने ग्रामस्थ, शाळकरी विद्यार्थी, मुले यांच्या जिवीतास धोका निर्माण झाला असून याप्रकरणी ग्रामस्थांनी मागील ६ महिन्यापासून सातत्याने मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री, सिंधुदुर्ग जिल्हा, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, तहसिलदार, दोडामार्ग व सावंतवाडी यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे तक्रारी करुनही वाळू माफियांविरोधात कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अवैध वाळू उपसा व वाहतूक करणाऱ्या वाळू माफियांवर तसेच वाळू माफियांस सहकार्य करणाऱ्या महसूल प्रशासनातील दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) दिनांक ४/१/२०२१ रोजी घोटगे (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) गावात तिलारी नदी पात्रात ०३ ब्रास अनधिकृत वाळूसाठा आढळून आला आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सिंधुदुर्ग जिल्हयात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध घालण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या भरारी पथकामार्फत माहे जानेवारी, २०२१ मध्ये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ११० प्रकरणी रुपये ८५,५६,७८३/- इतकी दंडात्मक रक्कम शासनजमा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) आकुर्डी येथील औद्योगिक क्षेत्रात शेत जमीन खरेदी विक्रीत फसवणूक झाल्याबाबत

**(१४) * ६९४२ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी-चिंचवड (जि.पुणे) एमआयडीसीमधील आकुर्डी येथील २७ एकर औद्योगिक क्षेत्राकरीता शेती खरेदी विक्री प्रकरणी फसवणूकीचा गुन्हा मलबार हिल पोलीस स्टेशनमध्ये दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, औद्योगिक प्रयोजनासाठी शेती, बिगर शेती करुन विक्रीचा प्रयत्न झाला असून सदर औद्योगिक क्षेत्र बिगर शेती प्रयोजनासाठी देता येत नसतानाही अर्थपूर्ण व्यवहार करुन बेकायदेशीरपणे शासनाकडून परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मलबार पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांच्या अनुषंगाने आरोपीस अटक करण्यात आली आहे काय व केव्हा, त्यानुसार आरोपीवर कोणत्या कलमान्वये कोणती कारवाई केली आहे, याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) फिर्यादी श्री.प्रकाश सरदेसाई यांच्या वडिलांनी व श्री.जयंत अदवंत यांनी मे.सरदेसाई अॅण्ड कंपनीसाठी एम.आय.डी.सी. आकुर्डी पिंपरी-चिंचवड, जि.पुणे येथील एम.आय.डी.सी.ची २७ एकर जमीन १९६५ मध्ये लीजवर घेतली होती. फिर्यादी यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वारसांनी सदर जागा श्री.रविराज ताकवणे व इतरांना लीजवर देण्याचे ठरविले होते. त्यासाठी फिर्यादी यांनी सन २०१९ मध्ये मे.सरदेसाई इंजिनिअरींग प्रा.लि. या कंपनीची स्थापना करुन श्री.ताकवणे यांच्या आर.टी. अॅडव्हायजर्स एल.एल.पी. या कंपनीस शेअर्स विकत देण्याबाबत एम.ओ.यु. करण्यात आला. तथापि, श्री.ताकवणे याने फिर्यादी यांच्या परस्पर फिर्यादी यांच्या भावाला खोटे सांगून शेअर्स ट्रान्सफर फॉर्मवर सह्या घेतल्या व फिर्यादी व त्यांच्या भावाने श्री.ताकवणे यांना दिलेल्या पॉवर ऑफ अॅटर्नीचा श्री.ताकवणे याने गैरवापर करुन फिर्यादी यांच्या कंपनीचे शेअर्स स्वतः व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे करुन फिर्यादीची फसवणूक केली. त्यानुषंगाने फिर्यादी

यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार मलबार हिल पोलीस ठाणे येथे त्यांची फसवणूक झाल्याप्रकरणी गु.र.क्र. १५०/२०२० नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे पुढील तपासासाठी वर्ग केल्यानंतर त्यास आगुवि गुन्हा नोंद क्र.२७/२०२० देण्यात आला आहे.

(२) शासनाकडून परवानगी देण्यात आलेली नाही.

(३) व (४) फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन मलबार पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१५०/२०२० कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे पुढील तपासासाठी वर्ग केल्यानंतर त्यास आगुवि गुन्हा नोंद क्र.२७/२०२० देण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये एका आरोपीस दिनांक ०९/१०/२०२० रोजी अटक करण्यात आली असून मा.न्यायालयाने आरोपीस दिनांक १९/१०/२०२० रोजी जामिनावर मुक्त केले आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील विशेष सहायक सरकारी अभियोक्तांचे थकीत मानधन देण्याबाबत

**(१५) * ६४६५ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.संजय दौंड, श्री.अरुणकाका जगताप, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयात ३५८ विशेष सहायक सरकारी अभियोक्ता कार्यरत असून सदर विशेष सहायक सरकारी अभियोक्ताची नेमणूक जिल्हाधिकारी यांच्यामार्फत करण्यात येत असून ते प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात सेवा देतात तसेच फौजदारी प्रक्रिया कलम २५ (३) अन्वये त्यांची दैनंदिन न्यायालयीन कामकाजानुसार मानधनावर नियुक्ती करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सुमारे ३५८ विशेष सरकारी अभियोक्त्यांना लॉकडाऊन काळात म्हणजेच माहे मार्च, २०२० पासून मानधन देण्यात आले नसून त्यांना अत्यंत तुटपुंजे मानधन देण्यात येत असल्यामुळे अभियोक्त्याचा उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्याचे दिनांक २९ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विशेष सरकारी अभियोक्ते हे पूर्ण वेळ काम करीत असतानाही त्यांना तुटपुंजे मानधन देण्यात येत असल्यामुळे समान कामाचे "समान वेतन मिळावे," अशी मागणी विशेष सहायक सरकारी अभियोक्ता संघटनेमार्फत शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन विशेष सहायक सरकारी अभियोक्तांचे थकीत मानधन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२), (३) व (४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५(३) अन्वये विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांच्या तात्पुरत्या स्वरुपातील नेमणूका या संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यामार्फत केल्या जातात. विशेष सहायक सरकारी अभियोक्ते हे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयात फौजदारी प्रकरणे चालवितात व त्यांना शासनाने शासन निर्णय क्र.डिपीपी-२०१२/प्र.क्र.११७/पोल-१०, दिनांक १५/०७/२०१३ अन्वये रुपये १०००/- (प्रतिदिन एकूण कमाल मर्यादा) याप्रमाणे निश्चित केलेल्या दराप्रमाणे मानधन देण्यात येते. अशाप्रकारे मानधनावर कार्यरत असलेल्या विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांची संख्या ३५८ नसून २४३ एवढी आहे. तसेच विशेष सहायक सरकारी अभियोक्ते हे शासन सेवक नसल्याने त्यांना शासकीय सेवकांना लागू असलेले नियम लागू नाही. त्यामुळे शासन वेळोवेळी ठरवेल, तेच मानधन त्यांना मिळू शकते. त्यामुळे मानधनाची अट स्वीकारुनच त्यांनी विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदाच्या नियुक्त्या स्वीकारल्या आहेत. त्यामुळे त्यांची तुटपुंजे वेतन मिळण्याची तक्रार योग्य नाही.

शासनाचे वित्त विभागाचे दिनांक २९/०१/२०२० व दिनांक १६/०४/२०२० रोजीचे परिपत्रकानुसार कंत्राटी पध्दतीने नेमलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे मानधन “०१-वेतन” या उद्दिष्टशीर्षातून न काढता “१०-कंत्राटी सेवा” या उद्दिष्टशीर्षातून खर्ची टाकण्याच्या सूचना निर्गमित केल्या आहेत. तथापि, अभियोग संचालनालयास “१०-कंत्राटी सेवा” हे उद्दिष्टशीर्ष मंजूर नसल्याने, सन २०२०-२०२१ या वित्तीय वर्षातील पावसाळी अधिवेशनात “१०-कंत्राटी सेवा” हे उद्दिष्टशीर्ष मंजूर करुन रुपये १०००/- ची लाक्षणिक मागणी मंजूर करण्यात आली होती. वरील कारणास्तव कंत्राटी तत्वावर नियुक्त विशेष सहायक सरकारी अभियोक्ते यांना मानधन देण्यामध्ये विलंब झाला. तद्नंतर हिवाळी अधिवेशनात “१० कंत्राटी सेवा” या उद्दिष्टशीर्षाखाली रुपये ४,२७,६८,०००/- इतके अनुदान पुरवणी मागणीव्दारे अभियोग संचालनालयास विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांसाठी मंजूर करण्यात आलेले असून त्यापैकी ५०% रक्कम म्हणजेच रुपये २,१३,८४,०००/- इतका निधी अभियोग संचालनालयास वितरित करण्यात आलेला आहे व सदर रकमेतून विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांचे थकित मानधन काही प्रमाणात प्रदान करण्यात आलेले आहे. पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध उर्वरित ५०% रक्कम वितरित करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे आणि सदर रकमेतून विशेष सहायक सरकारी अभियोक्त्यांचे थकित मानधन प्रदान करण्याचे योजिले आहे.

(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरींचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(१६) * ७२०५ श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील ९४ आदिवासी गावपाड्यांतील शेतकऱ्यांनी गत दोन वर्षापासून रोजगार हमी योजनेंतर्गत सिंचन विहिरी योजनेसाठी प्रस्ताव दाखल केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी प्रस्ताव दाखल करणाऱ्या ३० शेतकऱ्यांचे दोन वर्षापासून प्रलंबित असलेले प्रस्ताव पंचायत समिती कार्यालय, विक्रमगड ते जिल्हा परिषद, पालघर स्तरावर मंजुरी न देताच कार्यवाहीत प्रलंबित असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित शेतकऱ्यांनी पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (रोहयो), प्रधान सचिव, रोहयो, मा.पालकमंत्री, पालघर जिल्हा व मा.रोजगार हमी मंत्री यांना अनेकदा तक्रारी करुनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सिंचन विहिरींचे प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन प्रलंबित सिंचन विहिरींचे प्रस्ताव मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) सदर प्राप्त प्रस्तावांमध्ये त्रुटी असल्याने सदर त्रुटी पुर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, विक्रमगड यांना कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा अन्वये दाखल गुन्ह्यांवर कारवाई करण्याबाबत

**(१७) * ६४७४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायदा १९८९ (अॅस्ट्रॉसिटी कायदा) अन्वये गुन्ह्यांची संख्या राज्यात सतत वाढत असून गत सहा वर्षात या कायद्याखाली अनुसूचित जातीच्या नागरिकांवर झालेल्या अत्याचारांची संख्या सुमारे ९,४८७ पेक्षा जास्त आहे, तर अनुसूचित जमातीच्या नागरिकांवर झालेल्या अत्याचारांची संख्या सुमारे २,४७९ पेक्षा जास्त असल्याच्या नोंदी राज्यातील विविध जिल्ह्यातील पोलीस स्टेशनामध्ये झालेल्या आहेत व यापैकी हजारो गुन्ह्यांचा तपास पूर्ण झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या नागरिकांवर झालेल्या अत्याचाराप्रकरणी दाखल गुन्हयांवरील तपास व कारवाई जलद होणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सदर अधिनियमांतर्गत सन २०१५ ते २०२० या कालावधीत दाखल गुन्ह्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
|---|---|
| ११९६० | ३११५ |

त्यापैकी पोलीस तपासावर ६० दिवसांपेक्षा जास्त प्रलंबित गुन्ह्यांची संख्या ८९८ इतकी आहे.

(२) अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमांतर्गत दाखल गुन्ह्यांचा तपास व कारवाई जलद होण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

i) ६० दिवसांपेक्षा जास्त दिवस तपासावर प्रलंबित गुन्ह्यांच्या जलद तपासाबाबत दरमहा आढावा घेवून गुन्हे लवकर निर्गती करण्याबाबत सर्व पोलीस घटक प्रमुखांना कळविण्यात येते.

ii) यशदा, पुणे येथे पोलीस उप अधीक्षक/उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्याकरीता कार्यशाळा घेण्यात आली. तसेच कायद्यातील सुधारणेबाबत महाराष्ट्र पोलीस अकादमी व सर्व पोलीस प्रशिक्षण केंद्रांमध्ये कार्यशाळा घेण्यात आली.

iii) दिनांक १६ व १७/१२/२०२० रोजी नांदेड व अमरावती परीक्षेत्र तसेच दिनांक १५ व २९/०१/२०२१ रोजी नाशिक व कोल्हापूर परीक्षेत्र येथे ऑनलाईन कार्यशाळा घेण्यात आली.

iv) दोषसिध्दीचे प्रमाण वाढविणे व साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी व वैज्ञानिक पुरावा गोळा करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना सूचित करण्यात आले आहे.

v) गंभीर गुन्ह्यांमध्ये विशेष सरकारी अभियोक्ता यांची नेमणूक करण्याबाबत घटक प्रमुखांना सूचित करण्यात आले आहे.

vi) सदर अधिनियमांतर्गत दाखल गुन्ह्यांच्या ठिकाणी नागरी हक्क संरक्षण विभागाचे अधिकारी भेट देवून, गुन्हा योग्यरीत्या दाखल करण्याबाबत, तपास पारदर्शक होण्याबाबत कार्यवाही करतात.

vii) सदर गुन्ह्यांतील पिडितांना आवश्यकतेनुसार संरक्षण देणे, गुन्हा घडल्याच्या ठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात येतो.

viii) नागरी हक्क संरक्षण विभागाचे प्रमुख राज्यात दाखल गुन्ह्यांच्या प्रगतीबाबत व कामाच्या समिक्षेबाबत विविध घटकांच्या ठिकाणी भेटी देऊन आढावा घेतात. तसेच विशिष्ट गुन्ह्यांमध्ये गुन्ह्याच्या प्रगतीबाबत आढावा घेतात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## येवदा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) येथे पाणंद रस्ते बांधण्याबाबत

**(१८) * ६७२० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे** : सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवदा (ता.दर्यापूर, जि.अमरावती) परिसरातील शेत शिवारात अनेक भागात शेतकऱ्यांच्या सोयीकरीता पांदण रस्ते शिल्लक नसल्याने या रस्त्याअभावी अनेक शेतकऱ्यांच्या पिकांचे पावसाळ्यामध्ये नुकसान झाल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौजी येवदा भाग २ पेट्रोल पंपाजवळील खेकडी नाला पाण्याच्या पुरामुळे भरुन वाहत असून, सदरहू नाला शेताच्या मध्यभागी असल्याने या नाल्याचे पाणी शेतामध्ये जावून शेतातील पीक व सुपीक जमिनीचे अनेक वर्षापासून नुकसान होत आहे, तसेच पाणंद रस्त्याअभावी पावसाळ्यात शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येवदा येथे पाणंद रस्ते बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन येवदा येथे पाणंद रस्ते बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) हे खरे आहे. यासंदर्भात मौजा येवदा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील पेट्रोल पंपापासून ते गायरानकडे जाणारा रस्ता मंजूर करण्याबाबत ग्रामस्थांनी संयुक्तीक निवेदन सादर केले आहे. सदर रस्त्यास उपविभागीय अधिकारी, दर्यापूर यांनी प्रशासकीय मान्यता दिलेली असून त्याबाबत निधी मागणी प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे सादर केला आहे. त्यास मान्यता देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील बोगस उमेदवारांचे नियुक्ती पत्र रद्द करुन पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत

**(१९) * ७२८३ श्री.विनायकराव मेटे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ट्रॅम्पोलिन व टंबलिग या खेळ प्रकारात २५८ जणांनी बनावट प्रमाणपत्र प्राप्त करुन घेतल्या प्रकरणी आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडे सादर करण्यात आलेल्या अहवालानुसार आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यास्तरावर सुरु असलेली चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, चौकशीची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास ती कधीपर्यंत पूर्ण होणार आहे,

(२) असल्यास, २५८ बोगस खेळाडू उमेदवारांबाबत नियुक्ती पत्र रद्द करुन, प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांचा नियुक्तीसाठी विचार करण्याबाबत नियुक्ती प्राधिकरणास सूचित करण्याचे निदेश उपसंचालक, क्रीडा यांना दिले असूनही प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना नियुक्ती करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात बनावट क्रीडा प्रमाणपत्रे मिळवून नोकरी मिळविलेल्या बोगस उमेदवारांचे नियुक्ती पत्र रद्द करुन प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) होय, याबाबत आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्यास्तरावरील चौकशी पूर्ण झाली आहे.

(२) व (३) ट्रॅम्पोलिन व टंबलिग या खेळातील बोगस प्राविण्य प्रमाणपत्रा आधारे शासकीय सेवेत भरती झालेल्या उमेदवारांची अर्हता पत्रे रद्द करण्याबाबत व त्या अनुषंगाने खेळाडू आरक्षणांतर्गत आरक्षणाच्या जागेवर प्रतिक्षा यादीतील खेळाडूला लाभ देण्याबाबत खेळाडूच्या संबंधित निवड प्राधिकरणास पत्राव्दारे सूचित केले आहे. तथापि, या संदर्भात खेळाडूंनी दाखल

केलेल्या रिट याचिकेमध्ये, मा.उच्च न्यायालयाने उमेदवारांना प्रथम अपील दाखल करण्याची संधी देण्याबाबत सूचित केले आहे. त्यानुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२०) * ७३०९ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी, मारेगाव व झरी तालुक्यामध्ये (जि.यवतमाळ) प्रधानमंत्री शेतकरी सन्मान योजनेत बोगस लाभार्थ्यांना अनुदान वाटप केल्याने कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने बोगस शेतकऱ्यांची यादी तयार करणाऱ्यांवर तसेच बोगस लाभार्थ्यांकडून वाटप करण्यात आलेली रक्कम परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) अंशत: खरे आहे.

(२) यवतमाळ जिल्हयातील झरीजामणी तालुक्यामध्ये चुकीच्या पध्दतीने योजनेचा लाभ देणारे सुर्ला येथील तलाठी श्री विजय निखार यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. वणी व मारेगाव या तालुक्यांमध्ये बोगस लाभार्थ्यांची नोंदणी झालेली नाही. पीएम किसान योजनेंतर्गत दिनांक १८/०२/२०२१ पर्यंत वणी, मारेगाव व झरी तालुक्यामध्ये (जि.यवतमाळ) नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे लाभ मिळालेला असून आयकर भरणा करणारे व निकषांप्रमाणे इतर कारणांमुळे अपात्र घोषित लाभार्थ्यांकडून लाभ परतावा शासनास जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

| तालुका | नोंदणीकृत लाभार्थी | अपात्र लाभार्थी | परतावा करावयाची रक्कम | परतावा जमा लाभार्थी | परतावा जमा रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| वणी | २०९२० | ९४२ | ७६३८००० | २६४ | २४९४००० |
| मारेगाव | १४८२२ | ३७६ | ३१५०००० | ३७६ | १८६८००० |
| झरी | १४३०३ | ३७२ | ३११४००० | १७६ | १४००००० |

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील डीसी डिझाईन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने वाहन खरेदीत गैरव्यवहार केल्याबाबत

**(२१) * ६६६६ श्री.महादेव जानकर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.रामनिवास सिंह :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील डीसी डिझाईन्स प्रायव्हेट लिमिटेड या दिलीप छाब्रिया यांच्या कंपनीने वाहन खरेदीत हजारो कोटी रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपनीच्या मालकांनी चेसीस आणि इंजिन नंबरची एकापेक्षा अधिक वेळा नोंदी करणे, बहुतांश वाहनांवर अनेक वित्तीय संस्थांकडून कर्ज उचलणे, स्वतःच तयार केलेल्या कारवर कर्ज घेवून स्वतः खरेदी करणे आदि गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार संबंधित दोषी कंपनी मालकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) व (३) श्री.दिलीप छाब्रिया व इतर यांच्याविरुध्द फिर्यादी श्री.इंदरमल रमाणी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ८७५/२०२० अन्वये गुन्हा नोंद करुन, गुन्हे शाखा येथे गु.प्र.शा. गु.र.क्र. १७३/२०२० अन्वये गुन्ह्याची पुनर्नोंदणी करण्यात आली आहे. सदर गुन्हयात ३ आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्यातील पोलीस भरती प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(२२) * ७१०९ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य पोलीस दलामध्ये विविध घटकांतील शिपाई पदासाठीच्या रिक्त आठ हजार जागांसाठी राज्यभरातून १२ लाख उमेदवारांचे अर्ज आले असून सदर भरती प्रक्रियेत राबविण्यात आलेल्या महापोर्टलच्या प्रक्रियेला शासनाने स्थगिती दिल्याने पोलीस भरती प्रक्रिया प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भरती प्रक्रिया गृह विभागाकडून ऑफलाईन पध्दतीने घेण्यात येत असून ऑफलाईन भरती किचकट असल्याचे मत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून व्यक्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील पोलीस दलातील भरती प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सन २०१९ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त झालेल्या ५२९७ पदांसाठीची भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली असून ही भरती प्रक्रिया दोन टप्प्यात राबविण्यात येत आहे. यापैकी पहिल्या टप्प्यातील ३४५० पदांसाठी एकूण ८,८१,१५६ इतके अर्ज प्राप्त झाले आहेत. तसेच दुसऱ्या टप्प्यातील १८४७ पदांसाठी ३,१६,२५९ अर्ज प्राप्त झाले आहेत.

सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन निर्णय, दिनांक २१/०१/२०२१ अन्वये महापरीक्षा पोर्टल अंतर्गत घेण्यात येणाऱ्या परीक्षा पध्दतीत सुधारणा करण्यात आल्या असून त्यानुसार भरती प्रक्रियेची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) पोलीस शिपाई भरती प्रक्रिया ऑफलाईन पध्दतीने घेण्याचे नियोजित आहे. तथापि, ऑफलाईन भरती पध्दत किचकट असल्याचे मत वरीष्ठ अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आलेले नाही.

(३) व (४) सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान), शासन निर्णय दिनांक २१/०१/२०२१ नुसार संबंधित पात्र ओएमआर व्हेंडर्स (OMR Vender) ची कार्यकक्षा व कार्यपध्दती याबाबत आदेश निर्गमित झाल्यावर त्यानुसार पोलीस भरतीची पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे.

----------------

## राज्यातील सहकारी सूत गिरण्यांच्या प्रकल्प आराखड्याबाबत

**(२३) * ६३७० श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्री.महादेव जानकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विनायकराव मेटे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर** : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी सूत गिरणीचा प्रकल्प आराखडा रुपये ६१.७४ कोटी वरुन रुपये ८०.९० कोटी पर्यंत नेण्याचा प्रस्ताव गत १ वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सहकारी साखर कारखान्याकरीता सॉफ्टलोन, बँक गॅरंटी इ. निर्णय सातत्याने होत असताना, सहकारी सूत गिरण्यांच्याबाबतीत शासनाकडून निर्णय घेण्यात येत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सहकारी सुत गिरण्यांचा प्रकल्प आराखडा रुपये ८०.९० कोटीपर्यंत करण्याचा १५ दिवसात सकारात्मक निर्णय घेऊन कापूस उत्पादक शेतकऱ्यांवरील अन्याय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) हे खरे आहे.

सहकारी सूत गिरण्यांचा प्रकल्प किंमत रुपये ६१.७४ कोटी वरुन रुपये ८०.९० कोटी करण्यासंदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२/०३/२०२० रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये मुख्य सचिव यांनी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांचेकडून नुकतेच अभिप्राय प्राप्त झाले असून, त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

या विभागाचे शासन निर्णय, दिनांक २६/०३/१९८७ अन्वये सहकारी सूत गिरण्यांच्या पुनर्वसनासाठी थकीत वैधानिक देणी व इतर आर्थिक अडचणी सोडविण्यासाठी शासनाकडून कर्ज रुपाने अर्थसहाय्य करण्यात येत आहे.

राज्यातील चालू असलेल्या सहकारी सूत गिरण्यांना आर्थिक अडचणीतून बाहेर काढण्यासाठी दिनांक ०३/१२/२०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ५४ सहकारी सूत गिरण्यांना एकूण रुपये १०६.६५ कोटी इतके बिनव्याजी कर्ज उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

तसेच शासन निर्णय, दिनांक ११ जानेवारी, २०१७ अन्वये, सहकारी सूत गिरण्यांनी वित्तीय संस्थांकडून / रा.स.वि.म. कडून रुपये ३,०००/- प्रति चाती प्रमाणे ५ वर्षाच्या मुदतीसाठी कर्ज घेण्यास परवानगी देण्यात आली असून त्या कर्जावरील १२% पर्यंतचे व्याजाचा भरणा शासन करीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुळसवडे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) तलाठी सजाला कायमस्वरुपी तलाठी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) * ६५०५ श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुळसवडे (ता.राजापूर, जि.रत्नागिरी) तलाठी सजामध्ये सोलीवडे आणि जांभवली या महसूली गावाचा समावेश असून सजाला मागील चार ते पाच वर्षांपासून कायमस्वरुपी तलाठी नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तलाठी नसल्यामुळे गावातील नागरिकांची कामे प्रलंबित राहत असून ग्रामस्थांना त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तुळसवडे तलाठी सजाला कायमस्वरुपी तलाठी मिळावा यासाठी तुळसवडे ग्रामस्थांनी शासनाकडे वारंवार मागणी करुनसुध्दा तलाठी मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तुळसवडे तलाठी सजाला कायमस्वरुपी तलाठी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नाही.

(३), (४) व (५) तलाठी सजा तुळसवडे या रिक्त पदाचा कार्यभार अतिरिक्त स्वरूपात अन्य तलाठी यांचेकडे देण्यात आला होता. माहे जुलै, २०२० पासून सजा तुळसवडे येथे नियमित तलाठी यांची नेमणूक करण्यात आली.

तथापि, नियमित तलाठी वैद्यकीय कारणास्तव वारंवार रजेवर जात असल्याने सदर पदाचा कार्यभार अतिरिक्त स्वरूपात देण्यात आलेला आहे. तसेच उपविभागीय अधिकारी, राजापूर कार्यालयाकडून परिविक्षाधीन तलाठीपैकी एका तलाठीची नियुक्ती सजा तुळसवडे येथे ५ मार्च, २०२१ पासून करण्याचे नियोजित आहे.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेत नोकरीचे आमिष दाखवून आर्थिक फसवणूक केल्याबाबत

**(२५) * ७४६९ श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेत नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ५०० बेरोजगार तरुणांची रुपये १५ ते २० कोटींची फसवणूक झाल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणातील आरोपींना मुंबईतील गुन्हे शाखेच्या मालमत्ता कक्षाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नोकरीचे आमिष दाखवून तरुणांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांवर कारवाई करुन आर्थिक फसवणूक झालेल्या तरुणांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) मुंबई महानगरपालिका, भारतीय रेल्वे, आयकर विभाग इ. सरकारी विभागात नोकरी लावून देण्याचे आमिष दाखवून ४०० हून अधिक बेरोजगार तरुणांची फसवणूक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) फिर्यादी श्री.संदिप शंकर डमाळे यांना बीएमसीमध्ये नोकरी लावून देतो म्हणून प्रकाश सदाफुले याने फिर्यादीकडून रोख रक्कम रुपये ४,००,०००/- घेतली व नोकरी लावली नाही. यामध्ये त्यांची फसवणूक केल्याने फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन सायन पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.१७६/२०२० नुसार दिनांक १४/०८/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा गुन्हे शाखेस वर्ग झाल्याने गु.प्र.शा. गु.र.क्र.१७४/२०२० अन्वये नोंद घेण्यात आली आहे. या गुन्ह्यांची गुन्हे प्रकटीकरण शाखेकडे नोंद घेऊन मालमत्ता कक्ष,

गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचेमार्फत तपास करण्यात येत असून या गुन्ह्यात १२ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदरचे गुन्हे तपासाधीन असून, आरोपींचे बँक खाती व बचत ठेवी गोठविण्यात आले आहेत. गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील तपास सुरु आहे.

श्रीमती सुषमा संजय सुर्वे यांच्या मुलास बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पाणी विभागात नोकरी लावून देतो असे म्हणून प्रकाश तुकाराम सदाफुले व इतर यांनी रक्कम रुपये ३,००,०००/- स्वीकारुन फिर्यादीचे मुलास बृहन्मुंबई महानगरपालिकेत नोकरी दिल्याबाबतचे बनावट कागदपत्रे सादर करुन ती खरी असल्याचे भासवून त्यास नोकरी न देता फसवणूक केली आहे. याप्रकरणी फिर्यादी सौ.सुषमा संजय सुर्वे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सायन पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.२४९/२०२० नुसार दिनांक १५/१२/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा गुन्हे शाखेस वर्ग झाल्याने गु.प्र.शा. गु.र.क्र. १६७/२०२० अन्वये नोंद घेण्यात आली आहे. या गुन्ह्यांची गुन्हे प्रकटीकरण शाखेकडे नोंद घेऊन मालमत्ता कक्ष, गुन्हे प्रकटीकरण शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, मुंबई यांचेमार्फत तपास करण्यात येत आहे. या गुन्ह्यात ९ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्व आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत. सदरचे गुन्हे तपासाधीन असून, आरोपींचे बँक खाती व बचत ठेवी गोठविण्यात आले आहेत. गुन्ह्याच्या अनुषंगाने पुढील तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील डब्बेवाल्यांची फसवणूक झाल्याबाबत

**(२६) * ७५७२ श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अरुणकाका जगताप, श्री.अनिकेत तटकरे, श्री.अमोल मिटकरी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील डब्बेवाला संघटनेचे माजी अध्यक्षांनी डब्बेवाल्यांना मोफत मोपेड गाडी देण्याचे आश्वासन देऊन फसवणूक केल्याप्रकरणी घाटकोपकर पोलिसांनी त्यांना दिनांक ५ जानेवारी, २०२१ रोजी अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डब्बेवाला संघटनेच्या माजी अध्यक्षांनी किती डब्बेवाल्यांची व किती रकमेची फसवणूक केली आहे,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन डब्बेवाल्यांची फसवणूक करणाऱ्या दोषींवर कारवाई करुन त्यांची रक्कम डब्बेवाल्यांना परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) मुंबई डब्बेवाला संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर व इतर यांनी मुंबई जेवण डबे वाहतूक मंडळाचे तत्कालीन पदाधिकारी असताना त्यांच्यावर असलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेऊन मंडळाचे सदस्यांना मोफत टीव्हीएस मोपेड मिळवून देणार असल्याचा बहाणा करुन एकूण ६० सदस्यांचे वाहन कर्ज भरवनाथ पतसंस्था, वाशी, नवी मुंबई यांचेकडून मंजूर करुन घेतले. याप्रकरणी तपासाअंती एकूण ६१ सदस्यांच्या कर्ज मागणी अर्जापैकी ६० सदस्यांचे कर्ज रुपये १८,६०,०००/- मंजूर झाले. त्यानंतर साई एंटरप्राईजेसचे राकेश प्रसादे व टिव्हस्टा टु व्हिलरचे भावेश दोशी यांचेशी संगनमत करुन कर्जाची रक्कम पतसंस्थेकडून वर्ग करुन घेतली. तद्नंतर एकूण ६० सदस्यांपैकी ३८ सदस्यांना पुरेशी कागदपत्रे नसलेल्या टिव्हीएस मोपेड दिल्या. ३८ पैकी १५ सदस्यांना कोणतीही कागदपत्रे नसलेल्या मोपेड दिल्या. उर्वरित २२ सदस्यांची मोपेड न देता फसवणूक केली.

(३) या प्रकरणी घाटकोपर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.९८/२०२० नुसार दिनांक ०४/०२/२०२० रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील ५ पैकी ४ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यापैकी ३ आरोपी

न्यायालयीन कोठडीत असून एका आरोपीस मा.न्यायालयाने दिनांक १८/१२/२०२० रोजी अंतरिम जामीन मंजूर केला आहे. त्या आरोपींकडून रुपये ७,४६,३५९/- इतकी रक्कम पतसंस्थेमध्ये जमा करण्यात आली आहे. सदर गुन्ह्यातील एका आरोपीचा शोध चालू असून त्यास अटक करणे बाकी आहे. सदरचा गुन्हा तपासाधीन असून, गुन्ह्याचे अनुषंगाने सखोल तपास करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वर्धा (जि.वर्धा) शहरात अनधिकृत सदनिकांची उभारणी करण्यात आल्याबाबत

**(२७) * ७८६८ डॉ.परिणय फुके, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : मुद्रांक-२०१७/२४५३/प्र.क्र.४१०/म-१ (धोरणे), दिनांक २० सप्टेंबर, २०१९ नुसार प्रादेशिक योजना क्षेत्र, ग्रामपंचायत, ग्रामीण भागात बांधकामासंदर्भात सर्व प्रमाणपत्र देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना तसेच नगरपालिका, नगरपंचायत क्षेत्रात मुख्याधिकाऱ्यांना असून वर्धा (जि.वर्धा) शहरात विकासकांकडून कुठल्याही बांधकामाकरीता प्राधिकृत कार्यालयाकडून प्रमाणपत्र घेणे तसेच मालमत्तेचे विक्रीपत्र नोंदणी करतांना विक्रीपत्रासोबत भोगवटा प्रमाणपत्र (ऑक्युपन्सी सर्टिफिकेट) जोडणे बंधनकारक असताना विकासकाने बांधकाम प्रमाणपत्रे न घेता अवैधरित्या अनधिकृत सदनिकांची उभारणी करुन विकल्याबाबतची तक्रार श्री.पवन ठाकरे यांनी जिल्हाधिकारी, वर्धा यांच्याकडे दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विकासकाने नगररचना विभागात आर्थिक संगनमत करुन ऑक्युपन्सी सर्टिफिकेट मिळविले असून अवैध बांधकाम नियमित करण्याचे विकासक प्रयत्न करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्धा शहरातील इतर भागातही मोठ्या प्रमाणात अवैध इमारती उभारण्यात आल्या असून प्रशासकीय यंत्रणेच्या आर्थिक संगनमताने शहरात इमारती उभारल्याप्रकरणी तक्रारकर्ते यांनी स्थानिक लोकप्रतिनिधी, मा.मुख्यमंत्री, मा.महसूल व मा.नगर विकास मंत्री यांचेकडे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे तक्रारी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मालमत्ता विक्रीपत्र नोंदणी करतांना भोगवटा प्रमाणपत्र न घेता अवैधरित्या इमारती उभारल्याप्रकरणी विकासकावर तसेच सदरहू कामात सहकार्य करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा यांचेकडे सदर तक्रार प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) महाराष्ट्र स्थावर संपदा (विनियमन आणि विकास) अधिनियम, २०१६ च्या कलम ३ च्या पोट-कलम (२) मध्ये सुट दिलेले प्रकल्प वगळता कलम ३ च्या पोट-कलम (१) नुसार योग्य स्थावर मिळकतीच्या हस्तांतरण दस्ताच्या नोंदणीकरीता महाराष्ट्र नोंदणी नियम, १९६१ च्या नियम ४४ च्या उप-नियम (१) मधील बाब (i) लागु होत असल्याबाबत शासनामार्फत स्पष्टीकरणात्मक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुसार सह जिल्हा निबंधक (वर्ग-१), वर्धा यांनी सह दुय्यम निबंधक वर्धा-१ व वर्धा-२ कार्यालयात रेरा अधिनियमाचे उल्लंघन करुन नोंदणी झालेल्या दस्तांची तपासणी केली असता सह दुय्यम निबंधक कार्यालय, वर्धा-१ मध्ये नोंदणीकृत झालेल्या एकूण १४ दस्तांमध्ये व सह दुय्यम निबंधक कार्यालय, वर्धा-२ या कार्यालयात नोंदणी झालेल्या एकूण १७ दस्तांमध्ये वर नमुद तरतुदींचा संबंधित दुय्यम निबंधक यांनी भंग केला असल्याचे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने, सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, वर्धा यांचेमार्फत संबंधित दुय्यम निबंधक तसेच इतर अधिकारी/कर्मचारी यांचे स्पष्टीकरण तथा खुलासे मागविण्यात आले आहेत.

उक्त स्पष्टीकरण तथा खुलासा प्राप्त झाल्यानंतर नोंदणी केलेल्या दस्तांशी संबंधित विकासक तथा पक्षकारांसोबत संगनमत करुन वर नमुद नियमांचे जाणिवपूर्वक उल्लंघन करुन संबंधित दुय्यम निबंधक यांनी दस्त नोंदणी केल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आल्यास त्यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तवणुक आणि शिस्त व अपील) नियमानुसार तसेच आवश्यकता भासल्यास भारतीय नोंदणी अधिनियमाच्या कलम ८१, कलम ८२, कलम ८३ सह इतर अनुषंगिक तरतूदींनुसार कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात विशेषत: पाटोदा (जि.बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांची कांदा बियाणे खरेदी व विक्रीमध्ये फसवणूक झाल्याबाबत

**(२८) * ८०५७ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पाटोदा (जि.बीड) तालुक्यातील शेतकऱ्यांची कांदा बियाणे खरेदी व विक्रीमध्ये फसवणूक करुन शेतकऱ्यांची आर्थिक लुट करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांकडून कांदा बियाणे खरेदी करताना कंपनीकडून रुपये २० हजार ते रुपये ५० हजार क्विंटल पर्यंत खरेदी करण्यात येत असून कंपनीकडून शेतकऱ्यांना कांदा बियाणे विक्री करताना एमआरपी रुपये २ लाख ते रुपये ४ लाख क्विंटल प्रमाणे विक्री केला जातो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांकडून कांदा बियाणे रुपये २०० ते रुपये ५०० किलोप्रमाणे कंपनी खरेदी करतात मात्र कंपनीकडून ५०० ग्रॅम कांदा बियाणे रुपये १ हजार २०० ते रुपये १ हजार ८०० एमआरपीने शेतकऱ्यांना विक्री केला जातो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कांदा बियाणे खरेदी आणि विक्री करतांना कंपनीकडून शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक थांबविण्यासाठी पाटोदा, (जि.बीड) मधील शेतकऱ्यांनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कांदा बियाणे खरेदी-विक्री करतांना शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या संबंधित कंपन्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) बिजोत्पादन कार्यक्रम हा बिजोत्पादक शेतकरी व बियाणे उत्पादक कंपनी यांच्यामध्ये झालेल्या करारातील अटीशर्तीनुसार राबविण्यात येतो. करारातील अटीशर्तीनुसार बियाणे उत्पादक कंपन्या बिजोत्पादक शेतकऱ्यांकडून बियाणे खरेदी करीत असतात बियाणे कायद्यामध्ये बियाणे विक्रीची किंमत ठरविण्याबाबत कोणतीही तरतूद नाही. बियाणांची M.R.P.ठरविण्याचे अधिकार कंपन्यांना असून बिजप्रक्रिया खर्च, पॅकेजींग, मार्केटींग व अनुषंगिक खर्च विचारात घेऊन कंपन्या बियाणांचे M.R.P. दर निश्चित करतात. बियाणांची विक्री महत्तम किरकोळ विक्री (M.R.P.) दरापेक्षा जास्त दराने होणार नाही याबाबत नियंत्रण ठेवण्यात येते.
(४) हे खरे नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
(६) विलंब झालेला नाही.

-----------------

## राज्यात पोलीस गृहकर्ज (डिजीलोन) योजना राबविण्याबाबत

**(२९) * ८१३८ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील पोलीस कर्मचाऱ्यांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पोलीस महासंचालकांच्या निधीतून पोलिसांना गृह कर्ज (डिजीलोन) देण्यात येते, मात्र मागील दीड वर्षांपासून या कर्जाचे वितरण करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात पोलीस अधिकारी व कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना शासकीय घर सोडावे लागत असल्यामुळे पोलिसांना कायमस्वरुपी घरे मिळण्याकरीता सुरु केलेली ६ गृहकर्ज (डिजीलोन) योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त योजनेंतर्गत राज्यातील हजारो पोलीस गृह कर्जासाठी अर्ज करित असल्यामुळे त्यांना देण्यात येणाऱ्या कर्जात वाढ करुन व्याजात आणखी सवलत देण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात पोलीस गृहकर्ज (डिजीलोन) योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) होय.

(२) राज्यातील पोलीस दलातील विविध संवर्गातील कर्मचारी यांच्यासाठी घरबांधणी अग्रिमाकरीता बँकाकडून कर्ज घेऊन महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्यामार्फत पोलीस कर्मचारी यांना उपलब्ध करुन देण्यास शासनाने शासन निर्णय, दिनांक १०/०४/२०१७ अन्वये मान्यता दिली आहे. सदर योजनेव्दारे माहे मे, २०१९ पर्यंत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत एकूण ४७१२ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना रक्कम रुपये ८६८.५० कोटी कर्ज मंजूर वितरित करण्यात आले आहे. परंतु माहे मे, २०१९ पासून चे अर्ज निधीअभावी प्रलंबित आहेत.

(३), (४) व (५) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालयाकडे प्रलंबित असलेले घरबांधणी अग्रिमाचे सर्व अर्ज महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ यांच्या कार्यालयास पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहेत. प्रलंबित अर्जांसाठी आवश्यक घरबांधणी अग्रिमाच्या रकमेचा आढावा घेऊन शासन मान्यतेने पुढील उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## अर्नाळा (ता.वसई, जि.पालघर) समुद्र किनाऱ्यावरील जेट्टीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत

**(३०) * ८१७७ श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अर्नाळा (ता.वसई, जि.पालघर) किल्ल्यात जाण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर जेट्टी बांधण्याचे काम मंजूर होऊन दोन वर्षे उलटूनही जेट्टीचे काम पूर्ण झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समुद्र किनाऱ्यावरील जेट्टीचे बांधकाम अपूर्ण असल्याने अर्नाळा किल्ल्याच्या बेटावर जाण्याकरीता ग्रामस्थ व पर्यटकांना गुडघाभर पाण्यात उतरुन बोटीने जीवघेणा प्रवास करावा लागत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अर्नाळा समुद्र किनाऱ्यावरील जेट्टीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) सदर कामास सागरमाला योजनेंतर्गत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने दिनांक १६/०३/२०१८ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. तथापि, केंद्र शासनाची मंजुरी दिनांक २५/०९/२०२० रोजी प्राप्त झाली आहे.

(२) व (३) सदर काम केंद्र शासनाच्या सागरमाला प्रकल्पांतर्गत मंजूर असून निविदास्तरावर आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ (महानंद) च्या दूध संकलन आणि विक्रीमध्ये घट झाल्याबाबत

**(३१) * ६८३८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेश कराड, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ (महानंद) च्या दूध संकलन आणि विक्रीमध्ये घट होवून संस्थेची आर्थिक उलाढाल निम्म्यावर आल्याने आर्थिक वर्षात कोट्यवधी रुपयाचा तोटा झाला असून नागपूर व लातूर युनिट तोट्यात गेले असल्याने संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये ६०० कोटीवरुन रुपये २०० कोटींवर आली असल्याचे माहे डिसेंबर, २०२० च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ (महानंद) तोट्यात आल्याने कर्मचाऱ्यांचे पगार देणे अडचणीचे झाले असून कर्मचाऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शिखर संस्थेला ८७ जिल्हा व तालुका दूध उत्पादक सहकारी संस्था असतानाही या दूध उत्पादक संस्थाचे दूध संघामार्फत योग्य नियोजन न केल्यामुळे महानंद बंद होण्याच्या मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात लाखो लिटर दूध परराज्यातून सर्रास विक्रीसाठी येत असल्याबाबत डेअरी विभाग आणि दूध संघाकडून कोणतीही कारवाई होत नसल्याने राज्यातील दूध विक्रीविना असून दूध उत्पादक शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील ८७ दूध संघ प्रभावीपणे चालवून परराज्यातील दूध विक्रीवर निर्बंध घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे घोषित करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे मुंबईतील शाळा कॉलेज बंद होती. तसेच मुंबईतील अनेक रहिवासी मुंबई सोडून गेल्याने दुध विक्रीत मोठ्या प्रमाणात घट झाली होती. याशिवाय हॉटेल्स, मिष्ठान्न केंद्रे बंद असल्यामुळेही दुधास उठाव नव्हता, ही वस्तुस्थिती आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) ची सन २०१७-२०१८ ते सन २०१९-२०२० या कालावधीतील आर्थिक उलाढाल साधारणत: ४०० कोटी होती. तथापि, मार्च, २०२० पासून कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या परिस्थितीमुळे महानंदची उलाढाल रुपये २२२.७२ कोटी इतकी झाली हे खरे आहे. मात्र, महानंदचे लातूर व नागपूर युनिट हे मागील ३ वर्षापासून विविध कारणास्तव बंद असून सदर युनिट तोट्यात गेल्यामुळे महानंदची आर्थिक उलाढाल कमी झाली अशी वस्तुस्थिती नाही.

(२) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ (महानंद) च्या सर्व कर्मचाऱ्यांचे माहे जानेवारी, २०२१ पर्यंतचे वेतन विहित कालावधीत अदा करण्यात आले असून वेतनापोटी कोणतीही थकबाकी नाही.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यात मुंबई, नवी मुंबई, ठाणे, नाशिक या प्रमुख शहरांमध्ये राज्यातुन तसेच परराज्यातुनही पुरवठा होत आहे. जानेवारी, २०२१ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र राज्याबाहेरुन १३.१४ लाख लिटर दुधाची प्रतिदिन आवक होत आहे. याचवेळेस महाराष्ट्रातुन परराज्यात ९.५४ लाख लिटर दुध विक्रीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यामुळे दुध उत्पादक शेतकरी अडचणीत आलेला नाही.

(५) राज्यातील सहकारी दूध संघांच्या बळकटीकरण व आधुनिकीकरणासाठी शासनाने केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय दुग्ध विकास कार्यक्रम तसेच जिल्हा वार्षिक योजना या अंतर्गत वेळोवेळी आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले आहे. शासनाने राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत आतापर्यंत ४१ संघाना रुपये २९५.९६ कोटी इतके अनुदान वितरित केले असून राष्ट्रीय दुग्ध विकास कार्यक्रमांतर्गत ४३ संघांना रुपये ३१.९१ कोटी इतके अनुदान वितरित केले आहे. याशिवाय, दुग्ध व्यवसायातील चढ-उतार लक्षात घेऊन शासनाने नेहमीच हस्तक्षेप करुन सहकारी संघ/संस्था तसेच दूध

उत्पादक शेतकऱ्यांसाठी अनुदान योजना राबविल्या आहेत. अशा योजनांमध्ये शासनाने ऑगस्ट, २०१८ ते एप्रिल, २०१९ मध्ये दुग्ध व्यवसायाच्या स्थिरतेकरीता रुपये ६९९ कोटी इतका निधी वितरित केला आहे. तसेच लॉकडाऊन कालावधीमध्ये राज्यातील अतिरिक्त दुग्ध परिस्थितीचे नियोजनाकरीता रुपये २८७ कोटी इतका निधी सहकारी दूध संघांना वितरित केला आहे.

परराज्य संघाच्या महाराष्ट्र राज्यातील दुग्ध व्यवसायाच्या संदर्भात, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी मा.उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार वेळोवेळी सुनावणी घेऊन दिनांक १/१/२०१६ रोजी आदेश निर्गमित करुन, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम १५९ (२) नुसार परराज्य दूध संघाना महाराष्ट्र राज्यात दुग्ध व्यवसाय करण्यास परवानगी दिली आहे. सदर परवानगी आयुक्त, दुग्ध व्यवसाय यांनी निश्चित करुन दिलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहुन देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना शेततळ्याचे प्रलंबित अनुदान देण्याबाबत

**(३२) * ६६०४ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय फलोत्पादन कार्यक्रमांतर्गत शासनाच्या कृषी विभागाच्यावतीने मागासवर्गीय शेतकऱ्यांसाठी लागू असलेल्या सामूहिक शेत तलाव योजनेतून लाभ घेतलेल्या व शासनाच्या आराखड्यानुसार काम पूर्ण केलेल्या सांगली जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्याचे अनुदान मागील एक वर्षापासून देण्यात आले नसल्याने अनुदाना अभावी शेतकरी आर्थिक संकटात सापडला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्वसंमती घेऊन माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२० महिन्यात सर्व शेतकऱ्यांनी केलेली कामे पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्षात उमदी (ता.जत) व सांगली जिल्ह्यातील संबंधित अधिकारी येऊन पूर्ण झालेले कामाचे जिओ टॅगिंग व मूल्यांकन करुन एक वर्षाचा कालावधी होऊनही कृषी विभागाकडून अनुदान मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित लाभार्थ्यांनी वारंवार जिल्हा व तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे अनुदानासंदर्भात मागणी करुनही त्याची दखल घेतली जात नसल्याने लाभार्थ्यांना अनुदानापासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेततळ्याचे अनुदान लाभार्थ्यांना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सांगली जिल्ह्यास सन २०१९-२०२० मध्ये सामुहिक शेततळे या बाबींसाठी अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता स्पील ओव्हर कार्यक्रम रुपये १५४.७५ लाख व नवीन कार्यक्रम रुपये ९०.०० लाख असा एकूण रुपये २४४.७५ लाख रकमेचा आराखडा मंजूर आहे. त्यासाठी दिनांक ३१/०३/२०२० अखेर रुपये २००.८५ लाख खर्च केला आहे. परंतु, सांगली जिल्ह्याने सन २०१९-२०२० च्या मंजूर कार्यक्रमापेक्षा रुपये १२६.३७ लाखाचे जादाचे दायित्व निर्माण केल्यामुळे सन २०१९-२०२० च्या मंजूर कार्यक्रमातील उर्वरित शिल्लक कार्यक्रम रुपये ४३.९० लाख व जादा दायित्वाचे रुपये १२६.३७ लाख असा एकूण रुपये १७०.२७ लाख रकमेचा कार्यक्रम मंडळ कार्यालयास सादर केला. तसेच सदरची कामे सन २०२०-२०२१ मध्ये पूर्ण केली. रुपये १७०.२७ लाख रकमेच्या कार्यक्रमापैकी रुपये ६६.०९ लाख एवढी रक्कम अनुसूचित जाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली आहे. उमदी, ता.जत येथील एका लाभार्थ्यासह सांगली जिल्ह्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील एकूण ४३ लाभार्थ्यांच्या कामाचे मुल्यांकन व जिओ टॅगिंग पूर्ण करुन रुपये १०४.५० लाख अनुदान मागणीचे प्रस्ताव मंडळ कार्यालयास प्राप्त झाले आहेत. यासंदर्भात संबंधित लाभार्थ्यांनी तालुका व

जिल्हा कृषी अधिकाऱ्यांकडे अनुदानासंदर्भात मागणी केली. तथापि, कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर पुरेसा निधी प्राप्त न झाल्यामुळे लाभार्थ्यांना अनुदान वितरित करणे शक्य झाले नाही.

(४) एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान योजनेंतर्गत अनुसूचित जाती प्रवर्गाकरीता सन २०२०-२०२१ करीता पहिल्या हप्त्यापोटी मंजूर केंद्र हिस्सा व त्यासमरुप राज्य हिस्सा असा एकूण रुपये ५.५८३३ कोटी इतका निधी वितरणास मान्यता देण्याची विनंती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत वित्त विभागास करण्यात आली आहे. वित्त विभागाच्या मान्यतेनंतर निधी वितरित करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहरात ऑनलाईन कर्ज घेणाऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत

**(३३) * ६६३३ श्री.अंबादास दानवे, श्री.रामनिवास सिंह, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरात झटपट ऑनलाईन कर्ज मिळेल अशी जाहिरातबाजी करुन अनेक ऑनलाईन कर्ज घेणाऱ्यांची पिळवणूक होत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऑनलाईन घेतलेल्या कर्जाच्या वसुलीकरीता कर्जदारासह त्यांच्या नातेवाईकांनाही रात्रदिवस फोन व मॅसेज करुन धमक्या दिल्या जात असल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत अनेक पोलीस स्थानकात कर्ज घेणाऱ्या कर्जदारांनी पोलिसात तक्रारी नोंदविल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) सदर प्रकरणी औरंगाबाद येथे ऑनलाईन कर्ज घेणाऱ्या एका तक्रारदाराची तक्रार पोलीस स्टेशन उस्मानपुरा येथे दाखल करण्यात आली असून पोलीस स्टेशन उस्मानपुरा येथे दिनांक ०८/०२/२०२१ रोजी गु.र.नं.I-१५/२०२१ भा.दं.वि. कलम ३८४, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) पोलीस स्टेशन उस्मानपुरा येथे दाखल तक्रारीनुसार फिर्यादी यांनी प्लेस्टोर वरील ॲपकडून ३,४१,६१९/- रुपयाचे कर्ज घेतले होते. त्यापैकी रुपये १,७०,०००/- परत केले आहेत. तरी कर्ज देणारे तक्रारदारास वेळोवेळी कर्जाच्या नियमापेक्षा जास्त रकमेची मागणी करुन शिवीगाळ करुन मिडीयावर फसवणूक करणारे चोर म्हणून बातमी प्रसारीत करण्याची धमकी देत आहेत. सदर तक्रारीवरुन वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) विलंब झालेला नाही.

-----------------

## आंबोली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत

**(३४) * ६९७१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली (ता.डहाणू, जि.पालघर) येथील महामार्ग क्रमांक ८ करीता शेतकऱ्यांची संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीचा मोबदला मिळाला नसल्याने आदिवासी शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली असून शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.महसूल मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आंबोली येथील शेतकऱ्यांना भूसंपदानाचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) हे खरे नाही.

आंबोली येथील महामार्ग क्र.८ करीता संपादित जमिनीसाठी निवाडा दिनांक १८/०७/१९५८ रोजी जाहीर करण्यात आला असून निवाड्याप्रमाणे मोबदला रक्कम सर्व संबंधित खातेदारांना दिनांक १८/०७/१९५८ रोजी वाटप करण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.
(३) मौजे आंबोली येथील भूसंपादनाखालील जमिनीचा मोबदला यापूर्वीच संबंधित सर्व खातेदारांना वाटप करण्यात आला आहे. प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्याच्या सागरी हद्दीत बाहेरील राज्यातील बोटींना मासेमारीवर बंदी आणण्याबाबत

**(३५) * ७०५६ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.नागोराव गाणार, श्री.सुरेश धस, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रशांत परिचारक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वसई (जि.पालघर) येथील घोळ-दांढा आदी मोठे आर्थिक उत्पन्न देणाऱ्या माशांच्या थव्यांचा शोध घेण्यासाठी जिल्हयाच्या हद्दीत आलेल्या केंद्र शासित दिव-दमणच्या एका पर्ससीन ट्रॉलर्समधील मच्छीमारांनी वसईमधील मच्छीमारांवर जीवघेणा हल्ला केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पर्ससीन ट्रॉलर्सची जिल्हयाच्या हद्दीत शिरकाव करुन दादागिरी करण्याचे प्रमाण वाढले असल्याने त्यांचा फटका जिल्हयातील परंपरागत मच्छीमारांना बसत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्ससीन ट्रॉलर्सवाल्याची वाढलेल्या दादागिरीबाबत शासनाने चौकशी करुन या प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्याच्या सागरी हद्दीत गुजरातमधील बहुसंख्य मासेमारी बोटी सर्रास अनधिकृत मासेमारी करीत असल्याने राज्याच्या सागरी हद्दीत बाहेरील राज्यातील बोटींना मासेमारी करण्यास बंदी आणण्यासाठी मासेमारी प्रतिबंधक विधेयक मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सदरची घटना ही वसई किनाऱ्यापासून ८५ सागरी मैल अंतरावर घडलेली आहे.

पालघर जिल्हयाच्या सागरी जलधीक्षेत्रात पर्ससीन व ट्रॉलर मासेमारी नौकांचा शिरकाव झाल्याची घटना आढळून आलेली नाही.

(३) याबाबत चौकशी केली असता असे आढळून आले की, दिनांक २५/१२/२०२० रोजी वसई येथील एक यांत्रिक मासेमारी नौका वसई किनाऱ्यापासून ८५ सागरी मैल अंतरावर मासेमारीची जाळी पाण्यात सोडताना दमण येथील पर्ससीन मासेमारी नौकेवरील खलाशासोबत जागेबाबत मज्जाव केल्याने दमण येथील सात ते आठ नौकाधारकांनी वसई येथील नौकेस घेरुन नौका बुडविण्याचा व नौकेवरील व्यक्तींना जिवे मारण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर घटनेबाबत येलोगेट सागरी पोलीस स्टेशन, मुंबई येथे दिनांक २७/१२/२०२० रोजी भा.दं.वि.सं. १८६० मधील तरतुदीनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) व (५) हे खरे नाही.

तथापि, राज्याच्या सागरी जलधीक्षेत्रात परप्रांतिय नौकाव्दारे होणारे अनधिकृत मासेमारीस आळा घालण्यासाठी विभागामार्फत गस्ती नौकेव्दारे गस्त घालून अशा नौकांवर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम, १९८१ अंतर्गत कार्यवाही करण्यात येते.

त्याचप्रमाणे उक्त अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ देण्याबाबत

**(३६) * ६९४१ श्री.रामदास आंबटकर, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील ९७ हजार २१ शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून रुपये ३५ कोटी २३ लाखाचा विमा मंजूर होवूनही शेतकऱ्यांना विमा कंपनीकडून पीक विमा मिळाला नसल्याचे दिनांक  ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चंद्रपूर जिल्हयातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा लाभ मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

खरीप हंगाम सन २०१९ मध्ये चंद्रपूर जिल्हयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत करण्यात आली. योजनेंतर्गत ८९०५९ शेतकरी अर्जदारांनी रक्कम रुपये ८.१९ कोटी विमा हप्ता भरुन ७९४७६ हे. क्षेत्र विमा संरक्षित केले आहे. संबंधित विमा कंपनीकडून पात्र एकूण ८०३११ लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर नुकसान भरपाई रक्कम रुपये २६.३१ कोटी जमा करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

खरीप हंगाम सन २०२० मध्ये चंद्रपूर जिल्हयात प्रधानमंत्री पीक विमा योजनेची अंमलबजावणी भारती ॲक्सा जनरल इ. कंपनीमार्फत करण्यात आली. जिल्हयातील ०.९७ लाख शेतकऱ्यांनी रक्कम रुपये ७.३ कोटी विमा हप्ता भरुन ०.६९ लाख हे. क्षेत्र पिकाकरीता विमा संरक्षित केले आहे. योजनेंतर्गत स्थानिक नैसर्गिक आपत्ती व हवामानातील प्रतिकुल परिस्थिती यामुळे पिकांचे होणारे नुकसान या दोन्ही बाबीं अंतर्गत एकूण १४१९४ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रुपये ३.८५ कोटी कंपनीमार्फत वाटप करण्यात आली आहे.

तसेच काढणी पश्चात नुकसान भरपाई व उत्पन्नावर आधारित नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत अनुक्रमे ११७ शेतकऱ्यांना रक्कम रुपये ५ लाख व ८३१७३ शेतकऱ्यांना रक्कम रुपये २३.५३ कोटी इतकी नुकसान भरपाई रक्कम निश्चित करण्यात आली असून वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठवाडा कृषी विद्‌यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या भरती प्रक्रियेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३७) * ६८६६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६८७९ ला दिनांक १८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा कृषी विद्‌यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीत झालेल्या गैरव्यवहाराची विशेष चौकशी अधिकारी नेमून ॲक्शन टेकन रिपोर्ट घेण्यात यावा, अशी मागणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधींनी सन २०२०-२०२१ मध्ये वा त्यादरम्यान मा.कृषी यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेकायदेशीर व चुकीचे निर्णय घेवून नोकर भरतीत करण्यात आलेला गैरव्यवहार व इतर गैरप्रकारांची तसेच चौकशी अहवालावर कार्यवाही करण्यासाठी विशेष चौकशी अधिकारी नेमणूक करुन त्याचा ॲक्शन टेकन रिपोर्ट घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील प्रकल्पग्रस्तांच्या नोकर भरतीबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे लेखी निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(२) सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, परभणी यांनी दिलेल्या अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्यास्तरावर समिती गठीत करून अहवाल सादर करण्याचे निदेश देण्यात आलेले होते. तरी, सदर अहवाल प्राप्त झालेला असून त्यावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्हयातील वाळू लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत

**(३८) * ७४८१ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यात गेल्या दोन वर्षापासून वाळूचे लिलाव झाले नसल्याने प्रशासनाकडून वाळूची गरज लक्षात घेता माहे जानेवारी, २०२१ या महिन्यात वाळू लिलाव प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी तहसिलदारांना पाच हेक्टरपर्यंतच्या स्थळांचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पाच हेक्टरपर्यंतचे स्थळांचे प्रस्ताव जानेवारी महिना सुरु होऊनही तालुकास्थरावर प्रलंबित असून प्रत्यक्षात एकाही स्थळाचा प्रस्ताव जिल्हा प्रशासनाला प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) सुधारित वाळू धोरण दिनांक ३/९/२०१९ नुसार पाच हेक्टरपर्यंतच्या स्थळांचे सोलापूर जिल्हयातील मोहोळ व मंगळवेढा तालुक्यातील ९ वाळूगटांचे सर्वेक्षण करण्यात येवून दिनांक १७/२/२०२१ व दिनांक २२/२/२०२१ रोजी जनसुनावणी आयोजित करण्यात आली आहे. जनसुनावणी झाल्यानंतर सदर वाळूगटांचे प्रस्ताव राज्यस्तरीय तज्ञ मुल्यांकन समितीसमोर सादर करण्यात येतील. तसेच उर्वरित तालुक्यातील वाळूगट सद्य:स्थितीत पाण्याखाली असल्याने पाणी कमी होताच सर्वेक्षण करुन वाळूगट लिलावाबाबतची कार्यवाही प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील गुन्हेगारांवर कारवाई करण्याबाबत

**(३९) * ६५२८ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात राजकीय पक्षाचे कार्यकर्ता व त्याच्या भावाने तलवारीने तिघांवर हल्ला केल्याची घटना माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भातील व्हिडीओ सर्वत्र प्रसारीत झाला असून परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने तलवारीने हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांवर कारवाई करुन भिवंडी परिसरातील वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) या प्रकरणी पडघा पोलीस ठाणे हद्दीत दोन भावांनी तलवारीने तिघांवर हल्ला केल्याची घटना माहे जानेवारी, २०२१ मध्ये घडलेली नसून सदर घटना माहे नोव्हेंबर, २०२० मध्ये घडलेली आहे. त्यानुषंगाने पडघा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३०३/२०२० भा.दं.वि. सह ३२४, ३४१, ५०४, ५०६, ३४ सह भारतीय हत्यार अधिनियम ४,२५ अन्वये गुन्हा नोंद केलेला आहे. सदरची घटना राजकीय पक्षाशी संबंधित नाही.

(२) याबाबतचा व्हिडीओ सर्वत्र प्रसारित झालेला आहे. परंतु परिसरात घबराटीचे वातावरण निर्माण झालेले नाही.

(३) या प्रकरणी पडघा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ३०३/२०२० भा.दं.वि. सह ३२४, ३४१, ५०४, ५०६, ३४ सह भारतीय हत्यार अधिनियम ४,२५ नुसार यासिन चिखलेकर व अझरुद्दीन चिखलेकर यांच्याविरुध्द गुन्हा नोंद केलेला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे. गुन्ह्यातील दोन्ही आरोपी सध्या फरार असून त्यांचा शोध घेवून अटक करण्याकरीता विशेष पोलीस पथकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पडघा परिसरातील वाढत्या गुन्हेगारीस आळा घालण्यासाठी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग, सक्त रात्रौगस्त आणि नाकाबंदी करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तिवेतन व इतर लाभ मिळण्याबाबत

**(४०) * ७९९७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई पोलीस दलातून दिनांक १ जानेवारी, २०२० रोजीपासून माहे डिसेंबर, २०२० अखेरपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या पोलीस शिपाई, नाईक, हवालदार, उपनिरीक्षक, निरीक्षक आदी पोलीस कर्मचाऱ्यांपैकी बहुसंख्य पोलीस कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिवेतन, डेटकम-ग्रॅच्युइटी, शिल्लक रजेचे वेतन तसेच अन्य सेवानिवृत्तिच्या प्रित्यर्थ देय असलेली लाभाची रक्कम सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सेवानिवृत्तिनंतरची देणी मिळाली नसल्याने पोलीस कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त कालावधीत मुंबई पोलीस दलातून एकूण किती पोलीस अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत, त्यापैकी किती पोलीस कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिवेतन तसेच सेवानिवृत्ति प्रित्यर्थ अन्य लाभाची रक्कम अदा करण्यात आली व अद्यापी किती सेवानिवृत्त पोलीस कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तिवेतन व अन्य सेवानिवृत्तिनंतरच्या लाभाची रक्कम मिळालेली नाही,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई पोलीस दलातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तिवेतन व इतर लाभाची देणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) माहे जानेवारी, २०२० ते माहे डिसेंबर, २०२० या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्तिवेतन अदा करण्यात आलेले आहे. ज्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना डेथ-कम-ग्रॅच्युएटी, शिल्लक रजेचे वेतन देण्यात आले आहे.
(२) पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई या कार्यालयाकडून सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके वेतन पडताळणी पथक कार्यालयाकडे पाठविण्यात आली होती. परंतु, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने शासनाच्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर वेतन पडताळणी कार्यालयाकडून सेवापुस्तके पडताळणी होऊन विहित वेळेत प्राप्त होऊ शकली नाहीत. त्याचप्रमाणे महालेखापाल कार्यालयातही कर्मचाऱ्यांच्या मर्यादित उपस्थितीमुळे प्रकरणे प्राप्त होण्यास विलंब झाला.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके वेतन पडताळणी पथक कार्यालयात प्रलंबित राहिल्याने, माहे जानेवारी, २०२० ते माहे डिसेंबर, २०२० या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांना शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.सेपुप-२०२०/प्र.क्र.९/सेवा-७, दिनांक १२/०५/२०२० अन्वये सेवानिवृत्तिनंतरच्या प्रथम सहा महिन्यांकरीता तात्पुरते निवृत्तिवेतन कार्यालय प्रमुखांनी प्रदान करण्याबाबत शासनाने आदेश निर्गमित केले. तद्नंतर शासन वित्त विभाग परिपत्रक क्र.सेपुप-२०२०/प्र.क्र.२५/सेवा-४, दिनांक २५/६/२०२० अन्वये प्रथम सहा महिन्यानंतरच्या पुढील सहा महिन्यांच्या

कालावधीसाठी तात्पुरते निवृत्तिवेतन प्रदान करण्याबाबत विभाग प्रमुखांना अधिकार प्रदान करण्यात आले व एक वर्षानंतर पुढील सहा महिन्यांच्या कालावधीकरीता लेखा परीक्षा अधिकारी (मा.महालेखापाल) यांच्या सहमतीने तात्पुरते निवृत्तिवेतन मंजूर करण्याबाबत शासनाने आदेश दिलेले आहेत. त्यानुसार सेवानिवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना तात्पुरते निवृत्तिवेतन अदा करण्यात येत आहे. ज्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकाची पडताळणी झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना डेथ-कम-ग्रॅच्युएटी, शिल्लक रजेचे वेतन, भविष्य निर्वाह निधीची रक्कम, गट विमा योजना इत्यादी सेवा निवृत्तिनंतरच्या लाभाचे प्रदान करण्यात आले आहे.

(३) सन २०२० मध्ये मुंबई पोलीस दलातून एकूण १४६७ पोलीस अधिकारी/ कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना खालीलप्रमाणे सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देण्यात आलेले आहेत.

रजा सममूल्य वेतन - ४०९ कर्मचारी

भविष्य निर्वाह निधीची रक्कम - १०९२ कर्मचारी

गट विमा योजना - १०७७ कर्मचारी

उपदान - १२५ कर्मचारी

अंतिम निवृत्तिवेतन - ११८ कर्मचारी

तात्पुरते निवृत्तिवेतन - १३४६ कर्मचारी

तसेच खालीलप्रमाणे सेवानिवृत्तीनंतरचे लाभ देणे शिल्लक आहे.

रजा सममूल्य वेतन - १०५८ कर्मचारी

भविष्य निर्वाह निधीची रक्कम - ३७५ कर्मचारी

गट विमा योजना - ३९० कर्मचारी

उपदान - १३४२ कर्मचारी

(४) व (५) सेवानिवृत्तिची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर प्रलंबित राहिल्यामुळे व वेतन पडताळणी पथकावरील कामाच्या अतिरिक्त ताणामुळे पोलीस आयुक्त कार्यालयातील लेखा अधिकारी यांना वेतन पडताळणी पथकाचे अधिकार द्यावेत याबाबत पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे कार्यालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने विभागाने दिनांक २५/११/२०२० रोजी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई कार्यालयातील दोन लेखा अधिकारी यांना वेतन पडताळणीचे अधिकार सहा महिन्याकरीता दिलेत. सद्य:स्थितीत सदर लेखा अधिकाऱ्यांमार्फत वेतन

पडताळणीचे काम सुरु असून एकूण ५४२ सेवापुस्तकाची वेतन पडताळणी झाली आहे व भविष्यात लवकरच उर्वरित प्रलंबित सेवापुस्तक वेतन पडताळणीचे काम पूर्ण करण्याची कार्यवाही सुरु आहे.

----------------

## फॉरेन्सिक सायन्स पदवी घेतलेल्या विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४१) * ६४२२ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, डॉ.रणजित पाटील : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ७ मधील प्रश्न क्रमांक ५५०८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने न्याय सहाय्यक विज्ञान (फॉरेन्सिक सायन्स) या क्षेत्रात मनुष्यबळ तयार करणे हा उद्देश ठेवून दिनांक ३० मार्च, २००९ रोजीच्या शासन आदेशान्वये मुंबई, नागपूर आणि औरंगाबाद येथे शासकीय न्याय सहाय्यक विज्ञान संस्था सुरु करण्यात आले असून या तिन्ही संस्थामधून चार हजार विद्यार्थींनी पदव्या घेतल्या असून फॉरेन्सिक सायन्समध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षणाशी संबंधित क्षेत्रात रोजगार उपलब्ध होत नसल्याने विद्यार्थ्यांच्या अडचणीबाबत दिनांक १६/०७/२०१९ रोजी अप्पर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन कार्यवाही करण्याचे ठरले परंतु त्यावर निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील ३३७ रिक्त पदे भरणेबाबत पद भरतीचे निर्बंध शिथिल करणेबाबत सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभागास सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास मान्यता मिळाली आहे काय, तसेच, संचालनालयातील वर्ग-१ ची एकूण-५ पदे, वर्ग-२ ची एकूण-४३ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून सरळसेवेने भरण्यासाठी आयोगामार्फत सुरु असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१) राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिपत्याखाली मुंबई, औरंगाबाद व नागपूर येथे स्थापन करण्यात आलेल्या न्यायसहायक विज्ञान संस्थांमधून आतापर्यंत पदवी (बी.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) चे एकूण १०४४ आणि पदव्युत्तर पदवी (एम.एस्सी फॉरेन्सिक सायन्स) चे ३९४ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत. शासकीय न्याय सहायक विज्ञान संस्था व न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालय यांच्यात समन्वय निर्माण करण्यासंदर्भात अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षेतखाली दिनांक १६/०७/२०१९ रोजी झालेल्या बैठकीत सेवा प्रवेश नियमात बदल करणे, प्रशिक्षण, इंटर्नशिप कालावधी व शिष्यवृत्ती (स्टायपंड) ठरविणे, संयुक्त संशोधन करणे, अभ्यासक्रमामध्ये बदल करणे व इतर विषयाबाबत चर्चा होऊन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत ठरले. त्यानुसार विभागाने संचालनालयातील विविध संवर्गातील सेवाप्रवेश नियमात न्याय सहायक विज्ञान विषयातील पदवीचा समावेश करुन सुधारणा करणेबाबतचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाच्या मान्यतेने महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सहमतीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

तसेच, यापूर्वीच विभागामार्फत दिनांक ०७/०४/२०१५ व दिनांक २८/०४/२०१७ च्या शासन निर्णयान्वये न्याय सहायक वैज्ञानिक संस्थेच्या पदव्या न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयातील विविध संवर्गातील पदासाठीच्या शैक्षणिक अर्हतेस समकक्ष म्हणून ग्राहय धरण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे दिनांक ०८/१२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिनस्त हस्ताक्षर व छायाचित्रण विभागातील सहाय्यक शासकीय हस्तऐवज परिक्षक या पदाकरीता न्याय सहायक विज्ञान या विषयातील पदवी ही समकक्ष म्हणून ग्राहय धरुन त्यानंतर या पदांच्या परीक्षांकरीता पात्र ठरविण्यात आले आहे.

तसेच, या बैठकीत झालेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विभागाच्या दिनांक ०२/०३/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मोबाईल फॉरेन्सिक सपोर्ट युनिटकरीता Forensic Evidence Collection Officer (FECO) ची पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करणेबाबत पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास कळविण्यात आले आहे.

(२) व (३) न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा संचालनालयाच्या आस्थापनेवरील गट-अ ते गट-ड या संवर्गातील सरळसेवा कोट्यातील एकूण ३३७ रिक्त पदे भरणेसाठी पद भरतीचे निर्बंध शिथिल करणेबाबतचा प्रस्ताव विभागामार्फत दिनांक २८/०१/२०२१ रोजी वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे संचालनालयातील सहायक संचालक, गट-अ या संवर्गातील एकूण ५ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत सरळसेवेने भरणेबाबतचा शासनाचा प्रस्ताव आयोगाच्यास्तरावर प्रलंबित आहे आणि वैज्ञानिक अधिकारी, गट-ब या संवर्गातील ४३ रिक्त पदे भरण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने २२ उमेदवारांची शिफारस शासनास केली असून त्यांच्या नियुक्तीसंदर्भात शासनस्तरावरुन पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौ.कायरी (ता.जव्हार, जि.पालघर) येथील रोजगार हमी योजनेवरील मृत मजुरांच्या कुटुंबियास आर्थिक मदत देण्याबाबत

**(४२) * ७६९० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दौंड :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.कायरी (ता.जव्हार, जि.पालघर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रोजगार हमी योजनेंतर्गत रस्त्याच्या कामावर काम करीत असताना दिनांक १४ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास श्रीमती काकडी काकड्या पोटींदा या महिला मजूराचा आकस्मित मृत्यू झाला असून त्यांचे कुटुंबियास रुपये ५० हजार इतकी आर्थिक मदत रोजगार हमी योजनेंतर्गत देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना रुपये चार लाख, इमारत दुर्घटना व रुग्णालय दुर्घटनाच्याबाबत रुपये ५ लाख आणि वन्य प्राण्यांच्या हल्ल्यात मृत पावलेल्यांच्या कुटुंबियांना रुपये १५ लाख इतके आर्थिक सहाय्य देण्यात येत असताना रोजगार हमी योजनेवरील मृत मजुरांना केवळ ५० हजार रुपये हे तुलनात्मकदृष्टया योग्य नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रोजगार हमी योजनेवरील मजुरांची इमारत व बांधकाम कल्याण मंडळात नोंदणी करुन अन्य कल्याणकारी योजनांच्या धर्तीवर त्यांना रुपये ५ लाखांची आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी मृत महिला मजुराच्या कुटुंबियांनी तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच आदिवासी क्षेत्र आढावा समितीच्या अध्यक्षांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेंतर्गत काम करणाऱ्या मजूराचा आकस्मित मृत्यू झाल्याप्रकरणी त्यांचे कुटुंबियास रुपये ५ लाख आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत काम करत असताना कामावरील मजुराचा मृत्यू झाल्यास संबंधित मजूराच्या वारसदारास महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम, १९७७ (दिनांक ६ ऑगस्ट, २०१४ रोजी सुधारीत) चे कलम २७(एक) मधील तरतूदीनुसार सानुग्रह अनुदानाची रुपये ५०,०००/- इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.
(३) व (४) हे अंशत: खरे आहे.

इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ कलम १८ अन्वये स्थापन केलेल्या इमारत व इतर बांधकाम कल्याणकारी मंडळाकडे नोंदणी केलेल्या कामगारांना कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येतो. कै. काकडी काकड्या पोटींदा ही महिला, कामगार मंडळाकडे नोंदीत नाही.

महाराष्ट्र रोजगार हमी योजना अधिनियम १९७७ मधील तरतूदीनुसार कै.काकडी काकड्या पोटींदा यांच्या वारसदारास रुपये ५००००/- इतकी सानुग्रह अनुदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हे व तालुक्यांची फेररचना करण्याबाबत

**(४३) * ७७३८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजेश राठोड, श्री.मोहनराव कदम, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्ह्यांच्या व तालुक्यांच्या विषम क्षेत्रफळाचा त्रास सर्वसामान्य जनतेला होत असून प्रशासन, महसूल, न्यायनिवाडा, दळणवळण, शिक्षण, आरोग्य यासारख्या गोष्टी नागरीकांना उपलब्ध होत नाही, त्यासाठी त्यांना दूरपर्यंत प्रवास करावा लागत असून त्यात वेळ व खर्चही होत आहे, त्यामुळे राज्यातील जिल्हे व तालुक्यांची सम क्षेत्रफळाच्या सूत्रानुसार फेररचना करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१८ मध्ये राज्यातील जिल्हे व तालुक्यांची फेररचना करण्याबाबतच्या प्रश्नावर शिफारशी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती, सदर समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशींचे स्वरुप काय आहे, त्यावर निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील जिल्हे व तालुक्यांची फेररचना करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) राज्यात अस्तित्वात असलेले जिल्हे तसेच तालुक्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी शासनाकडे लोकप्रतिनिधी तसेच विविध माध्यमाव्दारे मागण्या प्राप्त झाल्या आहेत.

(२), (३) व (४) राज्यातील अस्तित्वात असलेल्या जिल्ह्यांचे विभाजन/पुनर्रचना करण्यासाठी राज्यस्तरावर कोणकोणते निकष विचारात घ्यावे, याचा अभ्यास करुन शासनास निकषांबाबत शिफारशी करण्यासाठी दिनांक २४/०६/२०१४ च्या शासन निर्णयान्वये अप्पर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यात आली होती.

तसेच राज्यातील तालुक्यांच्या विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे अध्यक्षतेखाली तालुका पुनर्रचना समिती गठीत करण्यात आली होती. सदर दोन्ही समितीचे अहवाल शासनास प्राप्त झाले आहेत.

सदर अहवालांतील शिफारशींच्या अनुषंगाने जिल्हा तसेच तालुका पुनर्रचना/विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. नवीन जिल्हा तसेच तालुका निर्मिती ही एक मोठी आर्थिक व प्रशासकीय प्रक्रिया असून खर्चिक बाब आहे. त्यानुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रिमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन जिल्हा तसेच तालुका निर्मितीसंदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत

**(४४) * ६७३० श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.मोहनराव कदम, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यात खरीप हंगाम सन २०२० मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेत एकूण २६ हजार २८१ शेतकऱ्यांनी पीक विमा भरला होता, परंतु फक्त १९४९ शेतकऱ्यांना पीक विमा मिळाला असून उर्वरित २४ हजार ५०० शेतकरी पीक विम्याच्या लाभापासून वंचित राहिले असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन धर्माबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना पीक विम्याची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे :** (१) हे खरे नाही.

खरीप हंगाम सन २०२० मध्ये धर्माबाद तालुक्यातील २६३१३ शेतकऱ्यांनी रक्कम रुपये १.७७ कोटी विमा हप्ता भरुन १७९०६.३७ हे. क्षेत्र पिकाकरीता विमा संरक्षित केले आहे. योजनेंतर्गत खरीप सन २०२० मध्ये धर्माबाद तालुक्यामध्ये स्थानिक नैसर्गिक आपत्ती झालेले नुकसान या बाबी अंतर्गत एकूण १९८२ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रुपये १.७७ कोटी व काढणी पश्चात नुकसान भरपाई या बाबी अंतर्गत ३४८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई रक्कम रक्कम रुपये २०.२२ लाख विमा कंपनीमार्फत वाटप करण्यात आले असून पिकांची उत्पन्नावर आधारित नुकसान भरपाई परिगणनेची कार्यवाही विमा कंपनीस्तरावर सुरु आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबत

**(४५) * ७३९० श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आयुर्वेद औषधासाठी गुणकारी असलेल्या शतावरीचे उत्पन्न घेण्याकरीता पुण्यातील २४ कॅरेट कंपनी आणि सांगलीतील संग्राम कंपनी यांनी उमरगा (जि.उस्मानाबाद) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतातील रोपे विक्री करुन मुळ्या खरेदी करण्याचा करार केला असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, २४ कॅरेट कंपनीने रुपये ५० दराने आणि संग्राम कंपनीने रुपये ३२ प्रति रोप विक्री केले असून संबंधित कंपनीने जागेवर येवून मुळी खरेदी करण्याचा लेखी करार करुनही मुळ्या खरेदी केल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ओली मुळी रुपये ३० दराने खरेदी करण्याचा करार केला होता, तसेच मुळी खरेदी करण्याकडे या दोन्ही कंपन्या दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे :** (१) अंशत: खरे आहे. लेखी करार झालेला नाही.

तथापि, शेतकऱ्यांनी दिलेल्या बयानावरुन कंपनीने तोंडी आश्वासन दिल्याचे नमूद केले आहे.

(२), (३) व (४) लेखी करार झालेला नाही.

तथापि, शेतकऱ्यांनी दिलेल्या बयानास अनुसरुन संबंधित कंपनीस खुलासा सादर करण्याच्या सूचना दिल्या असता कोविड-१९ चा प्रादुर्भाव वाढल्यामुळे कंपनीचे संपूर्ण काम आठ महिने बंद होते, तसेच संबंधित कोणत्याही शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष किंवा फोनव्दारे कंपनीशी संपर्क केला नसल्याचे कंपनीने खुलासा पत्र दिले आहे. त्याचप्रमाणे संबंधित शेतकऱ्यांची संपूर्ण माहिती मिळाल्यास तीस दिवसांत कळविण्यात येईल असे कंपनीने नमूद केल्यानुसार संबंधित शेतकऱ्यांची नावे, गांव व लागवड क्षेत्र यांची माहिती कंपनीस दिनांक २५/०२/२०२१ च्या पत्राव्दारे उपलब्ध करुन दिली आहे. त्यावर कंपनीकडून प्राप्त होणाऱ्या खुलाशानंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील रेती घाटांचे लिलाव सुरु करण्याबाबत

**(४६) * ७३२० डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील रेती घाटांचे मागील दोन वर्षांपासून लिलाव झाले नसल्याने शासनाचा करोडो रुपयांचा महसूल बुडून येथे मोठ्या प्रमाणात अवैधरित्या रेती विक्री जादा दराने केली जात असल्याने अनेक बांधकामे रखडली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन यवतमाळ जिल्हयातील रेती घाटांचे लिलाव सुरु करून जिल्हयात चाललेला रेती खरेदी-विक्रीचा अवैध कारभार बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) व (२) यवतमाळ जिल्हयात सन २०२०-२०२१ करीता २५ रेतीघाटांना पर्यावरण मान्यता दिली आहे. सदर २५ वाळूगटांपैकी ५ वाळूगट शासकीय कामासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. उर्वरीत वाळूगटाची लिलावाची प्रक्रिया राबविण्यात आली आहे. त्यापैकी १२ वाळूगटाचा लिलाव झालेला असून त्यापासून शासनास रुपये १६,८९,१४,०००/- एवढा महसूल प्राप्त झाला आहे. उर्वरीत ८ वाळूगटाच्या लिलावाची प्रक्रिया सुरू आहे.

यवतमाळ जिल्हयात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस प्रतिबंध करण्याकरीता उपविभागीय तसेच तालुकास्तरावर भरारी पथकाची स्थापना करण्यात आली आहे. सदर पथकामार्फत माहे एप्रिल, २०२० ते जानेवारी, २०२१ या कालावधीमध्ये गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीच्या ३५५ प्रकरणात रुपये ४८८ लक्ष एवढी दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच ६७ प्रकरणात फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोवा मुक्ती संग्राम आंदोलनातील स्वातंत्र्य सैनिकांना भूखंड देण्याबाबत

**(४७) * ७६३७ श्री.महादेव जानकर, श्री.रामनिवास सिंह, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९६ पूर्वी महाराष्ट्र शासनाकडे गोवा मुक्ती आंदोलनातील स्वातंत्र्य सैनिकांनी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन घरांसाठी शासकीय भूखंड मिळावा अशी मागणी करुन २४ वर्षाचा कालावधी होऊनही स्वातंत्र्य सैनिकांना भूखंड देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोवा मुक्ती आंदोलनातील १७ स्वातंत्र्य सैनिकांनी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन शासनाकडे केलेल्या मागणीच्या अनुषंगाने सन १९९८ मध्ये तत्कालीन शासनाने अंधेरीमधील वर्सोवा परिसरातील १०३५ चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड या संस्थेस मंजूर करुन संस्थेशी केलेल्या करारमान्यानुसार संस्थेने शासनाकडे रुपये १५ लाख ७५ हजार ९५० रुपये जमाही केले, तद्नंतर शासनाने सीआरझेडच्या नियमामुळे उक्त भूखंडावर घराचे बांधकाम करणे शक्य नसल्याचे गृहनिर्माण संस्थेस कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील तत्कालीन चार मुख्यमंत्र्यांनी भूखंड देण्याचे आश्वासन देवून काहीच कार्यवाही केली नाही, तसेच वय वर्षे नव्वद असलेल्या स्वातंत्र्य सैनिकांना ह्यातीत किमान इतरत्र भूखंड देण्याबाबत शासनाने काही कार्यवाही केली आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गोवा मुक्ती संग्राम आंदोलनातील स्वातंत्र्य सैनिकांना इतरत्र भूखंड देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३), (४) व (५) गोवा मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेने सन १९९४ साली गृहनिर्माण प्रकल्प उभारणीच्या प्रयोजनार्थ शासकीय जमीन मागणीची विनंती केली होती.

त्यानुसार सदर संस्थेस मौजे वर्सोवा, ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथील सर्वे क्र.१६१ खाडीलगतच्या अभिन्यास भाग-७क, भूखंड क्र.५ मधील १०३५ चौ.मी. क्षेत्राची शासकीय जमीन शासन ज्ञापन, दिनांक ०७/०७/१९९७ अन्वये तर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी दिनांक १८/०७/१९९८ रोजीच्या आदेशान्वये कब्जेहक्काने मंजूर केली होती.

तथापि, रिट याचिका क्र.११२६/२००२ मधील मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मौजे वर्सोवा स.नं.१६१ मधील खाडीलगत जमिनीच्या अभिन्यासातील हायटाईड लाईनच्या समुद्राकडील बाजूस असलेल्या भूखंडाचा विकास करणे शक्य नसल्याने गोवा मुक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेसह अन्य संस्थांना जमीन मंजूर करण्याबाबत देण्यात आलेली शासन हेतूपत्रे / शासन ज्ञापने / जिल्हाधिकारी यांचे आदेश रद्द करण्याचा निर्णय सन २००९ मध्ये शासनाने घेतला आहे. सदर संस्थेने जमिनीच्या कब्जेहक्काची भरलेली रक्कम परत करण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## मत्स्यव्यवसाय विभागातील प्रभारी सहाय्यक आयुक्तांना सेवेत मुदत वाढ दिल्याबाबत

**(४८) * ६६२० श्री.सदाशिव खोत, श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अतिवृष्टीमुळे जलाशयातील मासे नुकसानाची शासनाकडून भरपाई मिळवून दिल्याबद्दल तक्रारदाराकडून रुपये दोन लाखांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आलेले प्रभारी सहाय्यक आयुक्त यांना मत्स्यव्यवसाय विभागाने कार्यक्षम अधिकारी म्हणून सेवेत मुदतवाढ दिल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहेत काय,

(२) असल्यास, मत्स्यव्यवसाय विभागातील गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना सेवेत मुदत वाढ देण्यात आली असल्याचे शासन आदेश दिनांक १ जानेवारी, २०२१ रोजी निर्गमित करण्यात आले असून त्यामध्ये प्रभारी सहाय्यक आयुक्त यांचे नाव आठव्या क्रमांकावार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लाचखोरी करताना रंगेहात पकडण्यात आलेले प्रभारी सहाय्यक आयुक्त निलंबित असताना त्यांना सेवेत मुदतवाढ देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अस्लम शेख :** (१), (२), (३) व (४) श्री.प्र.के.सुर्वे, प्रभारी सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, कोल्हापूर यांना लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली अटक झाल्यामुळे दिनांक ९/१०/२०२० पासून निलंबित करण्यात आले आहे व त्यांच्यावर दिनांक ५/२/२०२१ अन्वये दोषारोपपत्रे बजावण्यात आली आहेत.

श्री.प्र.के.सुर्वे, प्रभारी सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, कोल्हापूर यांना कार्यक्षम अधिकारी म्हणून सेवेत मुदत वाढ दिलेली नसून सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १०/६/२०१९ च्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांची सेवा ५०/५५ व्या वर्षापलीकडे किंवा अर्हताकारी सेवेची ३० वर्षे पूर्ण झाल्यानंतरची त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्याबात विहित केलेल्या निकषांची पूर्तता होत असल्यामुळे वयाची ५० वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच्या गोपनीय अभिलेखांच्या अहवालानुसार त्यांची सेवा ५० वर्षापलीकडे ठेवण्यास जानेवारी, २०२१ मध्ये मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगाव (जि.बुलढाणा) शहरातील शासकीय भूखंडाचा नियमबाह्य वापर होत असल्याबाबत

**(४९) * ८१४६ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) शहरात शासनाने वाटप केलेल्या अनेक भूखंडाच्या वापरात बदल करत शासनाच्या अटींचे उल्लघंन करुन नियमबाह्य वापर भूखंडधारक करीत असल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील स्थायी अस्थायी पट्टेधारकांची मुदत संपल्यानंतरही त्यांचेवर कोणतीच कारवाई होत नसल्याने शासनाचा महसूल बुडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शहरातील ३४ भूखंडधारकांना भूमि अभिलेख विभागाने नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शहरात वाटप करण्यात आलेल्या सर्व भूखंडाचा फेरआढावा घेऊन शासनाच्या नियम व अटींचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३), (४) व (५) उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खामगांव यांनी माहे जानेवारी, २०२१ मध्ये खामगांव शहरात वाटप करण्यात आलेल्या एकूण २७ स्थायी व ११४ अस्थायी नझुल भूखंडाचे स्वाधिकाराने नियमित सर्व्हेक्षण केले असून शर्तभंग झालेल्या एकूण ३४ अस्थाई भाडेपट्टेधारकांना दिनांक ०९/१२/२०२० रोजी नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आलेला आहे. सदरहू भूखंडधारकांकडून उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खामगांव यांचेकडे खुलासा प्राप्त झाल्यानंतर उपविभागीय अधिकारी, खामगांव यांचेकडून महसूल व वन

विभाग, शासन निर्णय, दिनांक ०२/०३/२०१९ अन्वये दंडाची रक्कम भरणा करुन शर्तभंग नियमानुकुल करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच खुलासा सादर न करणारे किंवा शर्तभंग नियमानुकुल करण्यासाठी प्रतिसाद न देणारे भूखंडधारकांचे भूखंड शासनाच्या प्रचलित नियमानुसार शासन जमा करण्यात येतील.

-----------------

## मौजे तासपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आदिवासींच्या जमिनीवरील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(५०) * ७९७६ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे तासपाडा (ता.शहापूर, जि.ठाणे) येथील आसनगाव हद्दीत असलेल्या उपवनसंरक्षक विभागाच्या कार्यालयासमोरील आदिवासी महिलांच्या जागेमध्ये ३५ ते ४० बिगर आदिवासींनी बेकायदा कब्जा करुन अनधिकृत बांधकामे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची बेकायदा बांधकामे निष्कासित करुन जमिनीचा ताबा मिळावा याकरीता आदिवासी महिलांनी मागील ६ वर्षांपासून मा.महसूल मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, जिल्हाधिकारी, ठाणे व तहसिलदार, शहापूर यांचेकडे सातत्याने मागणी करुनही शासनाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याच्या कामाकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार अधिकारी/कर्मचारी यांचेवर कारवाई करुन आदिवासी जमिनीवरील अतिक्रमण व अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) मौजे आसनगांव, ता.शहापूर, जि.ठाणे येथील स.नं. ९०/३ व स.नं. ९१/२क या जमिनी आदिवासी खातेदार श्रीमती जानी रघ्या चिबडे व इतर यांच्या नावे असून सदर जमिनीवर १७ व्यक्तींनी अतिक्रमण करुन बांधकामे केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी, ठाणे यांनी तहसिलदार, शहापूर यांना दिले आहेत. त्यानुषंगाने तहसिलदार, शहापूर यांच्याकडे सुनावणीची कार्यवाही सुरु असून सुनावणीदरम्यान संबंधितांकडून समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास उक्त बांधकामाच्या निष्कासनाची कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील जमीन मोजणीची प्रकरणे निकाली काढण्याबाबत

**(५१) * ६५६९ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोविड-१९ मुळे लॉकडाऊन काळात भूमि अभिलेख विभागातील सुमारे १ लाख १० हजार जमीन मोजणी प्रकरणे प्रलंबित असून त्यापैकी माहे ऑक्टोबर, २०२० अखेर ४४ हजार प्रकरणे मार्गी लागली असून अद्याप ६५ हजार जमीन मोजणी प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात दररोज किमान सातशे ते आठशे नवीन मोजणी प्रकरणे दाखल होत असून त्यामुळे नागरिकांना मोजणीची तारीख आणि वेळ देण्याबाबत कार्यालयातील अधिकाऱ्यांना अडचणीचे होत आहे, नियमानुसार मार्च महिन्याच्या आत प्रलंबित असलेल्या मोजण्यांची कामे पूर्ण करणे गरजेचे असताना पुणे विभागात सर्वाधिक जमीन मोजणीची प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जमीन मोजणीचे प्रकरण प्रलंबित राहिल्यामुळे नागरिकांची गैरसोय होत असून राज्यातील जमीन मोजणी प्रकरणे मार्गी लावण्याबाबत लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील जमीन मोजणीचे प्रकरणे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२), (३) व (४) राज्यात माहे ऑक्टोबर, २०२० अखेर एकूण १,२०,६०२ मोजणी प्रकरणे प्राप्त झाली होती. त्यापैकी एकूण ५५,१२१ मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात आली असून माहे ऑक्टोबर, २०२० अखेर एकूण ६५,४८१ मोजणी प्रकरणे प्रलंबित होती. तद्नंतर माहे ऑक्टोबर, २०२० ते माहे जानेवारी, २०२१ अखेर एकूण ६२,२२९ मोजणी प्रकरणे प्राप्त झालेली असून त्यापैकी एकूण ४७,०१० मोजणी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. माहे जानेवारी, २०२१ अखेर एकूण ८०,२८७ मोजणी प्रकरणे प्रलंबित आहेत.

कोरोना विषाणूचा संसर्ग अधिकारी/कर्मचारी यांना होऊ नये यासाठी दिनांक २३/०३/२०२० ते दिनांक १२/०५/२०२० या कालावधीमध्ये मोजणी स्थगित ठेवण्यात आल्या होत्या, त्यामुळे ही मोजणी प्रकरणे प्रलंबित राहिलेली आहेत. त्याशिवाय ज्या प्रमाणात पुणे विभागात दरमहा प्राप्त होणाऱ्या मोजणी प्रकरणांची संख्या आहे. त्याप्रमाणात पुणे विभागात मोजणी प्रकरणे निकाली करणेकामी कर्मचाऱ्यांची रिक्त पदांची संख्या जास्त आहे. त्यामुळे प्रलंबित मोजणी प्रकरणांची संख्या सर्वाधिक असल्याचे दिसून येते. प्रलंबित मुदतबाह्य मोजणी प्रकरणे निकाली करणेकामी उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून पूर्ण क्षमतेने काम करुन घेण्यात येत आहे.

तसेच सर्व्हे ऑफ इंडिया यांचे सहकार्याने CORS (Continuously operating reference station) प्रणाली स्थापित करणेत आलेली आहे. सदर प्रणाली कार्यरत झाल्यानंतर Rover चे साह्याने मोजणी प्रकरणे निकाली काढण्यास मदत होणार आहे. त्याचप्रमाणे प्रलंबित मोजणी प्रकरणे सत्वर निकाली काढण्याबाबत जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी सर्व उप संचालक यांना सूचना दिल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दुग्ध व्यवसायातील कारभारावर नियंत्रण ठेवण्याबाबत

**(५२) * ७४४३ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने दुग्ध व्यवसायातील मनमानी/गैरकारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सन २०१९ मध्ये दुग्ध व्यवसाय सल्लागार समिती गठीत केली असून सदरहू समितीची गत वर्षभरात एकही बैठक झाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील दुग्ध व्यवसायाचा कारभार राजकीय भांडवलदारांवर अवलंबून असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दुग्ध व्यवसाय सल्लागार समितीची गत वर्षभरात एकही बैठक न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनिल केदार :** (१) शासनाने दिनांक ४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये "दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघ यांच्या दूधाच्या व्यावसायिक यांना येणाऱ्या अडचणीबाबत" समिती गठीत केली आहे. सदर समितीची कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे गतवर्षात बैठक आयोजित करणे शक्य झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

मात्र, सदर समितीची बैठक दिनांक २४/२/२०२१ रोजी घेण्यात आली आहे.

(२) हे खरे नाही.

(३) कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून लॉकडाऊन लावण्यात आल्यामुळे गतवर्षात समितीची बैठक आयोजित करणे शक्य झालेले नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत

**(५३) * ७९९८ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरात नवीन गृहप्रकल्प, रो-हाऊसेस, तीन धरणे, मुंबई-आग्रा महामार्ग, रेल्वे स्थानक असून या भागात २० गावे आणि ६० पाड्यांचा भार केवळ ५ पोलिसांवर असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या परिसराची लोकसंख्या ४५ हजारांवर गेल्याने तसेच गुन्हेगारीचेही प्रमाण वाढत असल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खर्डी येथे स्वतंत्र पोलीस ठाणे करावे, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थांनी मा.मुख्यमंत्री, मा.गृह मंत्री, मा.पालकमंत्री, ठाणे जिल्हा, प्रधान सचिव, गृह विभाग, विशेष पोलीस महानिरीक्षक, ठाणे ग्रामीण यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे मागील १ वर्षापासून केली आहे, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी खर्डी येथे स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल देशमुख :** (१), (२) व (३) खर्डी (ता.शहापूर, जि.ठाणे) परिसरात मर्यादित मनुष्यबळ असून सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास शहापूर पोलीस ठाण्यातून तात्काळ मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात येत असते.

खर्डी विभागातील स्थानिक ग्रामस्थ व कोणत्याही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी स्वतंत्र निवेदन दिल्याचे दिसून येत नाही.

खर्डी, ता.शहापूर, जि.ठाणे येथे नवीन स्वतंत्र पोलीस ठाणे निर्माण करणे व मनुष्यबळ वाढविणे याबाबतचा सविस्तर प्रस्ताव शासनाकडे प्राप्त होताच नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्ह्यातील भूमि अभिलेख कार्यालयातील गैरकारभाराबाबत

**(७४) * ७३१९ डॉ.वजाहत मिर्झा, श्री.शरद रणपिसे, श्री.राजेश राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यातील तहसिल कार्यालयात असलेले भूमि अभिलेख कार्यालयात शेतकऱ्यांची कोणतीही कामे होत नसून भ्रष्ट अधिकाऱ्यांकडून येथे गैरकारभार चालू असल्याचे माहे जानेवारी, २०२१ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांची आवश्यक कामे न करणाऱ्या व गैरव्यवहार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.बाळासाहेब थोरात :** (१), (२) व (३) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, शहर अध्यक्ष, मारेगांव यांनी दिनांक १२/१०/२०२० व युवा सेना, तालुका प्रमुख, मारेगांव यांनी दिनांक २०/१०/२०२० रोजी उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मारेगांव, जि.यवतमाळ कार्यालयातील अनियमिततेबाबत तहसिलदार, मारेगांव यांना निवेदन सादर केले आहे.

उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मारेगांव, जि.यवतमाळ कार्यालयातील अनियमिततेबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने उप अधीक्षक, भूमि अभिलेख, मारेगांव, जि.यवतमाळ कार्यालयाची विशेष तपासणी पथकाकडून तपासणी करण्यात आली असता, दोषी आढळलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या नियम १० अन्वये विभागीय चौकशीअंती शिक्षा बजावण्यात आली आहे.

-----------------

**विधान भवन :** **श्री.राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.